तू दत्ताच्या नगर निवासी
मूळपुरुष तू, तू अविनाशी.
असीम तव सामर्थ्य ॥४॥

सुमारे चारशे वर्ष धर्माचा प्रसार करून आणि भक्तांना मार्ग दर्शन करून श्रीस्वामी समर्थ चैतन्यात विलीन झाले. कधी श्रीपाद वल्लभ, कधी नृसिंह सरस्वती तर कधी श्री स्वामी समर्थ अशी नाना रुपे धारण करणाऱ्या या गुरुतत्त्वाने, अंश रुपाने गोदा तीरी. शिर्डीला साईबाबांचे रुप घेऊन वास्तव्य केले. शिर्डीच्या परिसराचा कणकण् साईबाबांच्या लीलांनी मुद्रांकित झाला आहे. श्रद्धा आणि समर्पण हीच त्यांची अनुग्रहांची सूत्रे होती. याच थोर सत्पुरुषाच्या नामस्मरणाने अनेकांनी संकटाशी संघर्ष केला, भवसागर पार केला. त्या थोर संताचा हा नामघोष करीत आपण ही भवसागर पार करू या.

साई ! साई ! मुखी म्हणुं या
जगीचा हा भवसागर तरु या ॥धृ॥

हृत्कमळाच्या सिंहासनी
मूर्ति शोभे लोंचनी
तन्मयतेने सेवा करुनी
साई दत्त स्मरूं या ॥१॥

निराकार तो पालनकर्ता
नाना रुपे नटवीं जगता
मोहापासुन दूर राहुनी
श्री गुरु चिंतन करुं या ॥२॥

गुरू सेवेचा धर्म जाणुनी
पुनीत कर्म हा जगी मानुनी
मोक्ष प्राप्तिचे मर्म जाणुनी
गुरुसेवा नित करुं या ॥३॥

ज्यांना ईश्वरी चैतन्याचा पावन स्पर्श झाला ते धन्य होत. इन्दूरचे नाना महाराज ताराणेकर हे असेच एक पुण्य पुरुष. या साक्षात्कारी पुरुषाच्या अनुग्रहानं अनेक भक्त संकटमुक्त झाले आहेत संसार सागराच्या भयंकर प्रलयातून तरुन गेले आहेत. आपल्याला दुःख मुक्त करणाऱ्या गुरुविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा पुण्य दिवस म्हणजे गुरुपूजनाचा दिवस. मंगलमय वाद्यांच्या घोषात गुरूच्या दिव्यमूर्तीला नेत्रांच्या निरांजनाने ओवाळीत भक्तगण जेव्हा भक्तीच्या रंगात रंगून जातो तेव्हा बघणाऱ्याच्या अंतःकरणात ही अष्टसात्विक भाव दाटून येतात. गुरुपूजनाच्या सोनेरी सोहळ्यातजे सहभागी झाले ते खरोखर धन्य होत.

भक्तीभावे चला मंदिरा,
पुजुया गुरुराजा
क्षण हा सोनियाचा

नानां विधि नाना भावांनी,
पुजु या गुरुराजा
दिवस सोनियाचा.. आज ॥धृ॥

नानांची इन्दूर नगरी
भासते अमर ही पुरी
सेवेला धावुनी येई भाव भक्तांचा
क्षण हा आनंदाचा ॥१॥

भक्तिभावे हे गुरुपूजन
भक्तांचे मधु सुस्वर गायन
वाद्यांसह होतो घोष गजर नामाचा
क्षण हा आनंदाचा ॥२॥

नाना शोभती सिंहासनी
सद्गुरू मुर्ति लोचनी
गुरुलीला भक्तासंगे दिवस भाग्याचा
क्षण हा आनंदाचा ॥३॥

भक्ताच्या जीवनात संकटाची वादळावर वादळे येतात पण ज्याच्यावर गुरुकृपेचा वरदहस्त आहे त्याला असल्या वादळाची काय तमा. नामस्मरणाच्या नौकेत नसून स्वानंदाच्या साम्राज्याचा अमृतानुभव घेणारा भक्त सोऽहं स्वरूपात मग्न असतो. त्याच्या हृदय वीणेची तार प्रणवस्वरात लागलेली असते आणि त्या तदाकार चिन्मय वीणेतून झंकार उमटतो तो दिव्यत्वाचा. साक्षात्काराचा झंकार, आणि भक्ताच्या मुखातून भाव व्याकुळ शब्द उमटतात.

वाजते मनवीणेची तार
गुरुकृपेने निघू लागला
भक्तिचा झंकार ॥धृ॥

सप्तस्वर हे जागृत झाले
प्रतिबंधने जवळी आले
सप्त स्वरांच्या घटा घटांतुनि
वाहे अमृत धार ॥१॥

अवधूताच्या या प्रासादी
मन हे रमले आत्मानंदी
गीता मधले गुंजितस्वर ते,
घेतसे आकार ॥२॥

जेथे जेथे श्री दत्तात्रय
'विजयानंद' तेथे अक्षय
मनवीणेच्या स्वरांमधुनि ये ऐकू ललकार ॥३॥

पत्ता : पाटकर वाडा, सारस्वत बँकेसमोर,
भगवतसिंग रोड, डोंबवली (पूर्व)

□□□

# "सबका मालिक एक"

- धर्माजी मोतीराम पाटील



मानवी जीवन म्हणजे परमेश्वराचा अंश होय. आम्ही सर्व त्याचीच लेकरे आहोत. या विश्वाचा चालक फक्त तो एकच होय. त्याशिवाय दुसरा कोणीही नाही.

म्हणूनच हे मानवा ! मनाशी अंतरंगी विचार कर अन् पहा.

हिंदू, मुस्लीम, बुद्ध, खिश्चन आदि धर्मांचे लोक आपले विचार निरनिराळ्या शब्दात मांडतात अन् म्हणतात की, मी हिंन्दू, मी मुस्लीम, मी बुध्द, मी खिश्चन. पण सर्वांचा कर्ता एकच असताना आम्ही मात्र अशा वेगवेगळ्या विचारांना कायम घट्ट अशी मिठीच मारून ठेवलेली आहे. अन् त्यामुळेच आम्ही एकमेकापासून दूर.... दूर.... असे आहोत.

साईवचनांतून 'सत्यदर्शन' मात्र हे आहे की, 'सबका मालिक एक' अन् 'श्रद्धा सबुरी' या दिव्यभव्य शब्दब्रह्मांतून निघालेले सूर म्हणजे स्वच्छ, शुद्ध, निर्मळ, निखळ, वेदरुपी असे बाहेर पडलेले होत की, हे मानवा ! तू त्या परमेश्वराचा अंश म्हणून आहेस हे मात्र कदापी विसरू नकोस !

पण आज मात्र निरनिराळे धर्म दिसत आहेत, अन् आपआपल्या विचारांची जी मते प्रदर्शित करीत आहेत, ती अनादि काळापासून केवळ स्वार्थासाठी म्हणून पडलेले गट होत. कोण देवपूजेसाठी आपआपल्या विचारांच्या धर्माप्रमाणे रोजा, नमाज करतो, तर कोण जपमाळ जपतो, तर कोण सोळा सोमवार उपवास करून देवाला आपलासा करावयास बघतो. हे सर्व जरी ठीक असले तरी प्रत्येक माणूस हा परमेश्वराचाच अंश असताना नको ती द्वैत भावना अन् वैमनस्य का हो ! एक म्हणतो, आमच्याच धर्माची तत्वे बरोबर आहेत, तर दुसरा म्हणतो, आमची धर्मतत्वे अशी आहेत, तशी आहेत. शब्द निरनिराळे पण आम्हा सर्वांना जायचं आहे मात्र एकाच ठिकाणी होय !

एक म्हणतो, हमारा ईश्वर आदम हौवा असून आम्ही त्यापासून जन्मलो आहोत. तर दुसरा म्हणतो, आम्ही एडम आणि इवपासून जन्मलो आहोत. आमचा ईश्वर तोच आहे. तर तिसरा म्हणतो, आम्ही मनू शतरुपीपासून जन्मलो आहोत, त्यामुळे आमचा ईश्वर तोच होय. अशा निरनिराळ्या विचारांनी अंतरंगी मनाला (ईश्वररुपी) झोपवून आम्ही मात्र स्वतःच फसत आहोत. अन नको त्या धर्माधाच्या अज्ञानपणामुळे आम्ही एकमेकांचे वैरी आणि भांडणतंटे लढाई करु लागलो आहोत.

वास्तविक सत्यधर्म (मानवताधर्म) हे मर्म आम्ही मात्र अंतरंगी झोपविलेला आहे. अन् यामुळेच ही एक खोटी अन् स्वार्थासाठीच अरेरावी चाललेली आहे आणि त्याची मात्र आज आम्ही नको ती कर्मफळे भोगीत आहोत. ईश्वरमात्र (सबका

मालीक एक) दूरुनच हे पहात आहे. अन् हसत आहे.

कौरव-पांडवांना मार्गदर्शन करताना आणि त्यांच्यात समेट घडवून आणताना भगवान श्रीकृष्ण ज्यावेळी प्रयत्न करीत होते त्यावेळी कौरवांचे 'अधर्माचे अज्ञान' पाहून कृष्ण नुसताच हसला असे म्हटलेले आहे. कृष्णाच्या या हसण्याचा गर्भीत अर्थ मात्र कौरवांच्या भौतिक विषय-वासनेच्या अज्ञानामुळे त्याना समजत नव्हता. त्यामुळेच त्यांनी (कौरवानी) त्यांचा नाश करुन घेतला. ''अधर्माने हरले ते कौरव, धर्माने जगले ते पांडव'' हे सर्वश्रूत आहेच !

साईदेव भक्ती नाममात्र सर्व प्रिय भक्तांसाठी गीतेचे प्रवचन करून सर्व सकलजनांस संजीवनी ज्ञान देत होते. कुराणांतील अन् गीतेतील उपदेश, संदेश अन् राम-रहीम हेसुद्धा एकच कसे ? हे मंदिर मस्जिदमध्ये जावून साईदर्शन दर्शवीत होते.

धरतीवर अधर्म माजत असता माणसानं द्वैतापासून-अद्वैताकडे जावं अन् त्याला सत्यमार्ग मिळावा म्हणून तो जगाचा स्वामी (ईश्वर) संत या रुपात पृथ्वीवर धर्माच्या छायेखाली आणून प्रयत्न करीत असतो. यासाठीच संत जन्म घेतात अन् धर्मजागृती करतात.

**''संत जन्मी घेती अन् जागविती''**
**''शिर्डी साईदर्शन हेचि दर्शविती''**

या सृष्टीत पंचमहाभुतांतील शक्तींतून आपण जन्म घेतलेला आहे. गीतेत उद्धृत केल्याप्रमाणे

**''। ममैवांशो जीवलोके जीव भूतः सनातन्नः ।**
**। मनः षष्ठांनिंद्रियानि प्रकृकतस्थानि कर्षती ।''**
**भगवंत अर्जुनास निवेदन करतात की,**

हे अर्जुना ! या प्राकृत जगांतील हे बद्ध जीव माझे सनातन अंश आहेत. आणि ते बद्ध अवस्थेत असून मनासह सहा इंद्रियांशी आसक्त होऊन विषय-वासनेत गुंतलेले आहेत. यामुळेच त्यांना माझा (परमेश्वराचा) विसर पडत चाललेला आहे. म्हणूनच त्यांना माझ्याशी एकरुप होण्यासाठी, अन् मुक्तीसाठी एक मार्ग आहे, तो म्हणजे शक्ती होय. या भक्तीच्या माध्यमरुपी आरशात त्यांनी मला पहावं अन् जन्माचं सुख भोगावं आणि मुक्त व्हावं. आज शिर्डी साईदर्शन हेच दर्शवीत आहे.

शिर्डी साईबाबांच्याबाबत आज अखिल दुनियेत जे आकर्षण निर्माण झालेले आहे ती एक भगवंताची नैसर्गिक शक्ती म्हणून होय. साईबद्दल आपण जर त्यांचेजन्मगांव, ठाव, ठिकाण यांचा शोध घेतला तर तो आपणांस मिळत नाही. मग ही एक शक्ती जन्मास आली तरी कुठून ? तर आपल्या भारतीय संस्कृतींतील जसे वेद अपौरुषीय आहेत कीं, त्यांचा कोणी लेखककर्ता नाही. तर ती एक सृष्टीनिर्मितीच्या वेळी नैसर्गिक शक्तीची म्हणजे त्या सृष्टीकर्त्या स्वामीची (ईश्वराची) निर्मिती मानतो. त्याचप्रमाणे साईबाबा ही एक अशीच नैसर्गिक शक्ती म्हणजे अयोनी जन्म पावलेली एक भगवंताची शक्ती होय.

साईवचनांतून निघालेले सूर (ब्रह्मवाक्ये) आपणास दर्शवीतात कीं, 'सबका मालीक एक' याबाबत निवेदन करताना आपण सूक्ष्मदृष्टी अंतरंगी जागृत करावयास हवी अन् ती अन्तर्वेषी होऊन कीं, जर कोणी आपणास प्रश्न केला किंवा विचारले कीं, तुमच्या वडिलांचे नांव काय ? तेव्हा आपण सहजपणे उत्तर देऊ कीं, माझ्या वडिलांचे नाव रामदास आहे. त्यानंतर पुन्हा जर आपणास प्रश्न केला की, रामदासांच्या वडिलांचे नाव काय ? त्याचंही उत्तर आपण देऊ की, रामदासांच्या वडिलांचे नाव नामदेव आहे. पुन्हा प्रश्न केला की, नामदेवांच्या वडिलांचे नाव काय ? त्यांचेही वडील असतीलच ना ? तेव्हा असेच आपण विचारत पुढे पुढे गेलो तर शेवटी उत्तर काय ? तर त्या सृष्टीकर्त्या भगवंताची एक शक्ती (श्रीविष्णू) ईश्वर होय. आणि जगांतील सर्व धर्मीय त्याचेच अंश होय. म्हणूनच ईश्वर हा आपला प्रत्येकाचा अंशी असून आपण प्रत्येकजण त्याचे अंश आहोत. म्हणूनच 'साईबाबावचन' ''सबका मालिक एक'' सर्व धर्मियांना दर्शवितात हे 'सत्यंशीवं होय'.

आणि हे समजण्यासाठी हे मानवा ! तू शुद्ध, निष्काम, अनासक्त अशी माझी भक्ती कर अन् अंतरंगी 'श्रद्धा, सबुरी' धर, त्यामुळे तू माझ्याशी एकरूप होशील. अन् तुला ते माझे सगुण, निर्गुण, साकार, निराकार, ब्रह्म, परब्रह्म काय आहे ते दिसेल. आणि मग तू त्या ब्रह्म सागरात न्हाऊन निघशील, अन् मोक्ष पावशील.

साई अद्वेताचा साक्षात्कार, साई मानवता धर्माचा ईश्वरी अवतार, कोणी दिगंबर दत्त म्हणा, तर कोणी विठ्ठल रखुमाई म्हणा, कुणी साऊली माऊली म्हणा, कुणी जगत-जननी म्हणा, तर कोणी रामरहीम म्हणा, अल्ला अकबरही म्हणा, कारण साईबाबा मंदिरमध्येही दिसत, तसेच मस्जिदमध्येही दर्शन देत.

**इथं ना मुस्लीम ना हिन्दू**
**ना शीख ना आणखी कुणी**

**आम्ही सारे मानवता**
**धर्माचे धनी !**

यामुळे आपणास हीच प्रचिती पहावयास मिळते कीं, साईबाबानी जाती, धर्म विषमता यांना मूठमातीच दिली होती. साई परब्रह्म स्वरूप म्हणूनच गुरुपौर्णिमा, दसरा, रामनवमी यावेळी तर शिर्डीचा महिमा काय वर्णावा ! किती गर्दी त्या शिर्डीत ! मुंग्यांसारखी माणसे साईदर्शनासाठी धांव घेत असतात. शिर्डीला जणू भक्तीचा मोगराच फुललेला दिसतो. दैनंदिन जीवनसुद्धा शिर्डी म्हणजे मानवी जीवनाची सरळ, सोपी शुद्ध जीवनाची हिरवळ वाट होय. अन् त्या वाटेने सारे भक्तजन साईभक्तीचा सुगंध घेत, घेत मंदिरात दर्शन घेऊन आपले सुखशांतीचे हीत करून घेत असतात.

आलेला कोणीही रिकामा म्हणून परत जात नसतो. त्याला साईकृपा ही लाभलेलीच असते. तो जाताना सुगंध घेऊन जात असतो. अन् आपल्या जीवनात (संसारात) सुगंध निर्माण करीत असतो. भारतीय संस्कृतींतील मानवताधर्माची वाटचाल म्हणजे साई शिर्डीधाम आपणास आठवण करून देत आहे.

आज सगळीकडे अशांतता पसरलेली आहे. माणूस पैशांच्या पाठीमागे सारखा धावत आहे. सस्कृतीची जोपासना तो विसरलेला आहे. भक्ती म्हणजे काय ? सन्त म्हणजे काय ? आणि त्यापासून मी जन्मोजन्मी कसा सुखी होईन याचा तो विचारच करीत नाही.

पश्चिमेंतील श्रीमंत राष्ट्रे इतकी श्रीमंत असूनसुद्धा त्यांच्यावर नको त्या परिस्थितीत दुःखमय जीवन जगण्याची पाळी का येते ? याचा विचार करु लागली आहेत, अन् भारतीय संस्कृतीकडे वळलेली आहेत.

सोन्याची लंका असलेला रावण संपूनच गेला. शिल्लक राहिलाच नाही. रावणाची तसबीर कुठेही अन् कुठल्याही दुकानात विक्रीस ठेवलेली दिसत नाही, असं का हो ? तर त्याचे उत्तर एकच, ते म्हणजे तो संपत्तीच्या लोभात संस्कृतीच विसरला म्हणून !

पण वल्कलं नेसलेला राम मात्र आजपर्यंत शिल्लक असून सूर्य, चंद्र, पृथ्वी असेपर्यंत शिल्लक राहील, कारण संस्कृतीची पूजा होय.

**म्हणूनच म्हणतो कीं,**
**होऊ दे तुझे साईमन**
**हेची रे तुझे धन**
**मिळेल तुला वरदान**
**सुखी होईल जीवन**

अन् यामुळेच हे मानवा ! तुला ''सबका मालिक एक'' या साईदर्शन संस्कृतीचा वारसा मिळून तू अन् तुझा परिवार धन्य ! धन्य ! होईल. हे त्रिकाल चरणी सत्यं शीवम् सुंदरम् समज.

**मु.पो. गडब, ता. पेण,**
**जि. रायगड.**

---

# त्रिगुणी दत्त साई

शिर्डीच्या साईनाथा, माझा प्रणाम घ्यावा।
जाण्यास पैलतीरी, तुम्ही मजसी हात द्यावा ॥धृ॥

संसार सागरी या, नाही कुणी कुणाचा।
जगती पराधीन, हा पुत्र मानवाचा।
छाया दुपारची ती, नाही खरा विसावा।
कृपासिन्धू साई, मम प्रार्थनेस पावा ॥१॥

जाळ्यांत षडरिपुंच्या, हा जीव गुंतलेला।
नाही समर्थ कोणी, तुजविण तारण्याला।
परीस स्पर्श तुझा, मम जीवनास व्हावा।
कारुण्यनिधी साई, मम प्रार्थनेस पावा ॥२॥

तुझी द्वारिकामाई, भक्तांसी तीर्थस्थान।
अखंड दीप्त धुनी, तव चैतन्य प्रमाण।
या दिव्य वास्तुला, ना जातीधर्म ठावा।
अमृत मूर्ती साई, मम प्रार्थनेस पावा ॥३॥

जो जो शरण, येई, भावे अनन्य तुजला।
त्याचाच तू होशी, तूं भक्तीचा भुकेला।
अखंड तेज दायी, तूं अक्षयदीप बरवा।
चैतन्य सूर्य साई, मम प्रार्थनेस पाव ॥४॥

अर्पिली तुजला ही, मी काव्य सुमन माला।
स्विकारी साईनाथा, वसंत अर्चनेला।
जनांच्या जीवनी या, ऋतुराज वसंत फुलवा।
त्रिगुणी दत्त साई, मम प्रार्थनेस पावा ॥५॥

■ वसंत गोडबोले

अमृतकलश

# नाममहिमा आणि न्यू सॉयकॉलॉजी अथवा आटो सजेशन्

## (इ.स. १९२९ मधील श्रीसाईलीलातील लेखाचे पुनर्मुद्रण)

आपल्या हिंद भूमीतले सर्व संत आजपर्यंत श्रीहरीच्या नामाचा जप, गजर, अथवा जयघोष करण्याकडे सामान्य जनतेचे खास ध्यान खेचत आले आहेत. या कलियुगात हरिनामासारखे दुसरे साधन नाही. हरीचे नाम घेण्यासाठी एका कवडीचा खर्च करावा लागत नाही. पाहिजे त्या वेळी पाहिजे त्या ठिकाणी प्रभूची आठवण करून त्याच्या नावाचा जप करावा. प्रभुप्राप्तीचे हे अत्यंत सहज व सुलभ साधन आहे असा नामाच महिमा आहे.




नाममहिमा श्री साईबाबांना अत्यंत प्रिय असे. जरी ते स्वतः पूर्ण अनुभवी आणि साक्षात्कारी दैवी पुरुष होते, तरी देवाच्या नावाचा त्यांचा जप अहर्निष चालत असे. साधन काय करावे असे विचारता, देवाचे नाव घ्यावे असे ते सांगत असत. ज्यांचे ज्यांचे जे इष्ट दैवत असे, व त्या दैवताच्या नावाचा जप त्यांने आपल्या स्वतःपाशी गुप्त रीतीने जरी चालविला असेल, तरी त्यांचे ते कृत्य बाबांना माहीत असून ते त्याला त्याविषयींची जाणीव देऊन, प्रोत्साहन देत असत.

माझ्या मित्राला श्रीरामदासस्वामी अत्यंत आदर्शवत् वाटत असत. श्री आत्माराव बोवाकृत श्री रामदासस्वामींच्या चरित्राचे प्रेमपूर्वक पारायण करीत असता, श्री रामनामाचा तेरा अक्षरी तारक मंत्र आपल्या मनात ग्रहण करून त्याने त्याचा आपल्यापाशी जप सुरू केला. ही गोष्ट त्याला एकट्याला माहीत होती, आणि त्याने तो जप आपल्यापाशी काही महिने चालविला होता. सन १९१० साली तो श्री साई बाबांच्या दर्शनाला दोन वेळा गेला. सन १९११ साली मार्च महिन्यात तो आपल्या मुलालेकरांसहित दर्शनाला गेला. श्रींच्या सान्निध्यात जातेवेळी हा आपला मंत्र ठेवावा की कसे हा विचार त्याच्या मनात येताक्षणीच, बाबा आपले दोन्ही हात जोडून त्याला मोठ्या प्रेमाने बोलले, ''यावे रामचंद्र महाराज !!'' मित्राला गहिवर आला आणि त्याने त्या मंत्राचा जप आणखी बरेच मुदतीपर्यंत मनात कायम ठेवला, आणि त्यापासून त्याला कायिक आणि मानसिक पुष्कळ फायदा झाला आहे. खरे विचारता माझा स्नेही एक यःकश्चित् काबाडकष्ट करणारा साधारण मनुष्य आहे. आपल्या शास्त्राचे त्याचे यत्किंचितही अध्ययन नाही. पाश्चात्य शास्त्रांचे काहीसे तुटपुंजे ज्ञान आहे इतकेच. लहानपणी कै. श्री रामकृष्ण भांडारकरांच्या तोंडून प्रार्थनासमाजात एकलेले वाक्य, की ईश्वर हृदयस्थ आहे. या वाक्यावर त्याचा पूर्ण भरवसा. तो भरवसा त्याच्यावर जी जी संसारात भयंकर संकटे कोसळली, त्या त्या सर्व संकटातून पार पाडण्यास त्याला सर्व प्रकारे आधारभूत झाला. आणि जेव्हा श्री साईबाबांचे त्याला सन १९१० मध्ये प्रथम दर्शन झाले, त्या क्षणापासून पुढे वेळोवेळी श्री साई माऊलीच्या कृपेने त्याला अप्रतिम शिक्षण आणि इतर गोष्टीचा आनंददायक लाभ झाला आहे.

असो. वरील हकीकतीवरून नाममहिम्याची काय थोरवी आहे याचा लेखकाला स्वल्प का होईना, जो अनुभव आला आहे त्याहून सहस्त्रपट आनंददायक अनुभव इतरांना मिळावा ही त्याची श्री साई माऊलीपाशी अत्यंत नम्र आणि विनयपूर्वक याचना आहे. हा, आणि तसेच इतर लेख लिहिताना त्याला त्याच्या स्वतःचे व मित्रमंडळाचे जे अनुभव श्री सद्गुरू

माऊलीच्या पायापाशी दिसून आले, ते येथे यथाशक्ती नमूद केल्यावाचून दुसरे गत्यंतर नाही. यात आत्मश्लाघेचा काही प्रसंग दिसून आल्यास, वाचकांनी त्याला त्याबद्दल क्षमा करावी. निबंध लिहिण्यासाठी त्यांने जन्मात कधीही लेखणी हातात धरली नाही. म्हणून वेडीवाकडी वाक्ये अथवा तशाच तऱ्हेची विचारसरणी दिसून आल्यास त्याची सर्व प्रकारची जबाबदारी लेखकाच्या अज्ञानाची निदर्शक आहे असे समजून त्याला क्षमा करावी. काही गोड विचार निघाल्यास त्याचे श्रेय सर्वस्वी श्रीगुरु माऊलीला द्यावे अशी वाचकवृदांस नम्र विनंती आहे.

असो. नामाचा महिमा काय असावा, असा सवाल आधुनिक पाश्चात्य शास्त्रांचे अध्ययन केलेले विद्वान उभा करतील, आणि त्याचा तसा सवाल हा प्रचलित शिक्षणाचा परिणाम आहे, हे खरे आहे.

ईश्वर अगम्य आहे, निराकार आहे. त्यांच्या चिद्शक्तीद्वारे त्यांचे खरे स्वरूप समाधिस्थितीतच केवळ अनुभविता येते. तो अनुभव घेताना परमानंद होतो. द्वैतभावनेवर आल्यावर तो आनंद कसा काय आहे याचे वर्णन करता येत नाही. असे जे सुख, जे समाधान, जो आनंद, आत्मसाक्षात्कारानेच केवळ कळावयाचा, अनुभव घ्यावयाचा, त्याला नामसाधन रूप कसे होते ?

ईश्वराच्या अस्तित्वाचा विचार सर्व देशात जेथे जेथे मनुष्यप्राण्याने आपले वसतिस्थान केले तेथे त्याने निसर्गाचे खेळ पाहून, आपल्या अकलेप्रमाणे केला. इतर सर्व देशापेक्षा आपल्या हिंद भूमीतल्या ऋषिमुनींनी आपल्या अगाध ज्ञानाने, ईश्वराला त्याच्या चित्छक्तीद्वारे, प्राप्त करून घेता येतो, त्याला आत्मसाक्षात्काराने अनुभविता येतो ही गोष्ट प्रतिपादन केली. इतकी ज्ञानरुपी मजल दुसऱ्या कोणत्याही देशांतल्या विचारांची आणि अनुभवांची गेली नाही.

यज्ञयागाद्वारे प्राण्यांची हिंसा ईश्वरप्राप्तीसाठी करण्याची आवश्यकता नाही असे मत, श्री भगवान बुद्ध देवांनी प्रतिपादन केले. त्यांनी कर्मावर जास्त जोर देऊन, ज्याने त्याने आपाआपले कर्तव्य, सत्याला अनुसरून केले असता, पुष्कळ आहे असे शिकविले. या कर्तव्याची जाणीव इतकी प्रबळ झाली की, कास्पियन समुद्रापासून ते मळायाच्या बेटांपलिकडे, हिंद निवासी लोकांचा जय जयकार झाला, चीन, जपान, सायाम 'या दूरवरच्या देशात हिंदू संस्कृतीचा विजय झाला. ज्याचे जिवंत परिणाम अद्यापि दिसत आहेत. शिकंदराने हिंदुस्थानावर स्वारी केली तरी, त्याला माघार घ्यावी लागली. त्याच्याबरोबर असलेल्या हिरोडोटस नामक इतिहासज्ञाने आपल्या पुस्तकात नमूद केले आहे की, हिंदुस्थानात ''No man was found to tell a lie and no woman faithless.'' एकही मनुष्य असत्य वाणी वदणारा नव्हता, एकही स्त्री दुराचरणी नव्हती.''काय ही कर्तव्याची मातब्बरीची साक्ष ! त्यावेळी हिंदू लोक लढाया करीत नव्हते असे नाही. कर्तव्यासाठी समरांगणांत प्राण देत घेत असत.

पुढे श्री बुद्धदेवाच्या अनुयायांत मंत्रतंत्र वगैरे दुर्बलतेचे प्रकार घुसून, व बुद्धदेवांचे पुतळे बनवून, त्याची पूजाअर्चा होऊ लागली. त्यामुळे मूर्तिपूजेला जोर मिळाला. मूर्तीपूजेचे अनेक प्रकार चालू झाले. या प्रकारांना वळणीवर आणण्यासाठी श्री शंकराचार्यांचा अवतार झाला. त्यांनी लोकसंग्रहासाठी सूर्य पंचायतनाची पूजेत योजना करून अद्वैत मताची जाणीव देऊन, आपणा सर्वांवर अगणित उपकार केले आहेत. त्यानंतर विशिष्ट अद्वैत व द्वैत मताचा प्रचार होऊन, मतमतांचा गलबला विशेष जोरात आला. मूर्तीपूजेचा प्रचार वाढला. परमेश्वराच्या आराधनेसाठी त्याच्या सगुण रुपांना मूर्त स्वरूप भक्तांनी दिली, आणि त्यामुळे अनेक दैवते व मूर्ती निर्माण झाल्या. प्रत्येकाला, माझेच दैवत श्रेष्ठ व इतर दैवते गौण असे वाटून द्वेषभाव वाढला. जेथे तेथे केवळ शाब्दिक वादविवादाला अग्रस्थान मिळाले. श्री. बुद्धदेवाच्या वेळच्या कर्तव्याची, आत्मविश्वासाची, जाणीव लुप्त होत गेली. एकीकरण नष्ट झाले. अशावेळी परकीयांच्या स्वाऱ्या आपल्या देशावर वायव्येकडून व समुद्रकिनाऱ्यावर झाल्या.

मूर्तीपूजेचे खरे रहस्य नष्ट झाले. मूर्ती दगडाच्या अथवा धातूंच्या ही भावना वाढली. ही जड भावना वाढती ना तर मगदूर काय, की गिझनीचा महंमद सोमनाथाची मूर्ती फोडू शकता ! मूर्तीपूजेची निव्वळ कवाईत झाली. आणि पोकळ कवाइतेंचे पोकळ फळ जनतेला मिळाले. मूर्तीपूजेचे खरे रहस्य आपल्या देशातल्या संताना आणि शिवरायासारख्या महात्म्यालाच कळले. श्री नामदेवानी लहानपणी श्री विठोबाच्या मूर्तीला दूध प्यावयास लावले ही गोष्ट आजचे विद्वान कबूल करणार नाहीत, पण ते अशक्य नाही. नामदेवाला ती श्री विठोबाची मूर्ती दगड वाटत नव्हती. त्याच्या स्वतःच्या चित्छक्तीचे व श्री विठोबाच्या मूर्तीतल्या अंतर्गत चित्शक्तीचे इतके अप्रतिम तादात्म्य झाले की, त्या इतरांना दगड दिसणाऱ्या मूर्तीला दूध पिणे भाग पडले. हीच गोष्ट श्री शिवप्रभूची. श्री शिवप्रभूला श्री भवानी दगड दिसली नाही. तिचे ठिकाणी त्यांचे इतर अप्रतिम प्रेम, विश्वास आणि श्रद्धा होती

की, श्री भवानीरूपी चित्शक्तीला श्रीशिवरायांना योग्य तो सल्ला देणे भाग पडले. अलीकडच्या काळात मूर्तीपूजेचे खरे रहस्य जाणणारांत श्री रामकृष्ण परमहंसाना अग्रस्थान दिले पाहिजे. ही मूर्तीपूजा खरी, नाहीपेक्षा निव्वळ कवाईत. आपल्या इष्ट मूर्तीवर आपले जर खरे खरे निस्सीम प्रेम आहे तर ज्याप्रमाणे आपली मुलेमाणसे, पति, पत्नी, माता, पिता इत्यादी प्रिय माणसांच्या मूर्ती, मग ती माणसे हयात असोत अथवा मृत असोत, आपण आठवण करताक्षणीच आपल्या मनःचक्षूंपुढे दुग्गोच्चर होतात, त्याप्रमाणे जेव्हा आपल्या इष्ट मूर्तीचे रूप आपल्या मनःचक्षूंपुढे उभे राहाते, तेव्हाच खऱ्याखुऱ्या मूर्तिपूजेच्या ओनाम्याला प्रारंभ होऊन, पुढे स्वाभाविक आवडीने तिची मानसपूजा करता येते, व मग पुढे मन, बुद्धी व ते रुप यांची तन्मयता होते. हा अनुभव संतांनी घेतलेले आहे आणि श्री साई माऊलीने भक्तांना देऊन त्यांचे कल्याण केले आहे.

मूर्तीपूजेला लेखकाचा कटाक्ष आहे असे मुळीच नाही. साध्या भोळ्याभाबड्या माणसांना ध्यान करण्यासाठी इष्ट मूर्तीची आवश्यकता आहे. पूजेमध्ये चित्त एकाग्र करण्यासाठी प्राणायामादि साधनांची जरूरी गोवून दिली आहे. पण त्या अत्यंत उपयुक्त साधनांचा मुळीच उपयोग होत नाही. त्यांची निव्वळ कवाईत होत असते, तेथे तद्रुपता कशी व्हावी, आणि पूजेचे फळ तन्मयता, ती त्या बापड्या मूर्तीरुपी इष्टदेवतेने द्यावी कशी ?

या विचारामुळे ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज आणि आर्यसमाज ही अस्तित्वात आली. या संस्थांनी आपआपल्या परींनी जनतेला योग्य वळण लावण्याचा उद्योग चालविला होता. तरी निराकार प्रभूची सगुण रुपाने अथवा अग्निसाक्षित्वाने प्रार्थना करून आत्मसाक्षात्कार होण्यापर्यंत त्या समाजातील व्यक्तींची मजल अथवा जिज्ञासा जोपर्यंत पोहोचली नाही, तोपर्यंत संतांच्या शिकवणीचे मर्म त्यांच्या हातात आले नाही. असे दिलगिरीने म्हणावे लागते. सामाजिक बाबातीत त्यांची कामगिरी श्रेष्ठ आहे. सामान्य जनता त्यांचे अनुकरण करीत आहे, पण स्वधर्माचा जसा पाठिंबा मिळाला पाहिजे तसा जनतेत दिसून येत नाही. असे का, व आपले चुकीचे कोठे, याचा व्हावा तसा विचार होत नाही. जेथे तेथे अनास्था दिसून येत आहे. जनता कमकुवत झाली आहे. धैर्य नष्ट झाले आहे. अवनतीरुप उदासीनता सर्वांना ग्रासू पाहात आहे. याचे मुख्य कारण आत्मविश्वास लुप्त होणे.

जोपर्यंत बुद्धकालापूर्वी आणि बुद्धकाळीही आत्मविश्वासाच्या शिकवणीवर जोर देण्यात येत होता. जोपर्यंत, आपल्या आत असलेल्या चित्शक्तीची विकास होण्याची शिकवणूक ऋषिमुनींच्या आश्रमातून राजाच्या मुलापासून तो रंकाच्या पोरापर्यंत सारखीच मिळत होती, तोपर्यंत प्रत्येकाच्या हृदयात आपल्या कर्तव्याची जाणीव अबाधित राहून निधड्या छातीने सामान्य जनता वागली, आणि त्यामुळे तिने आपली भरभराट करून घेतली. पुढे जेव्हा शुष्क वादावादीचे दिवस आले, आपल्या अंतर्गत असलेल्या अतर्क्य व अमर्याद सामर्थ्याच्या शिकवणींची हेळसांड होऊ लागली. ईश्वराच्या सगुणरुपाची द्योतके मूर्ती यांच्या बाह्य स्वरुपांपासून सामर्थ्याची याचना करण्याकडे जनतेची दृष्टी फिरवण्यात आली, त्याबरोबर आत्मविश्वास दिवसेंदिवस ढासळत चालला. क्षुल्लक गोष्टींना महत्त्व आले. घराचे वासे मानसिक दुर्बलतारूपी वाळवीने पोखरून पोकळ केले. त्यामुळे केवळ शारीरिक बळावरच आत्मविश्वास असणाऱ्या बाहेरून रानवट संस्कृतींच्या झुंडीवर झुंडींच्या सोसाट्यापुढे आपले जनतारुपी घर डळमळून कोसळत होते, ते संतांच्या कृपेने आणि त्यांच्या वचनरुपी जिवंत आधारांच्या टेक्यांनी फक्त जमीनदोस्त व्हावयाचे राहिले आहे.

आता हा आत्मविश्वास पुन्हा जागृत व्हावा कसा ? एक वेळ अन्न मिळवायची, भ्रांति, देशात अठरा विश्वे दारिद्र्य, अशा वेळी तुम्ही कोठले कोहं सोहं घेऊन बसलात. प्राणायामादि साधनांना फुरसत नाही (मात्र बिझिकादिक निरर्थक डाव खेळण्यास अवसर मिळतो!) जीवनासाठी कोण भयंकर चढाओढ चालली आहे ! परीक्षा पास होऊन एम. ए., एलएल. बी. तीस रूपये पगारावर राहतो, आणि हाजी हाजी करून लांगूलचालन करतो. एखादे पाश्चात्य पोर रेल्वे स्टेशनावर खाडकन त्यांच्या बायकोमुलांपुढे त्याचा पाणउतारा करते. ते तो निमूटपणे सहन करतो. मात्र हाताखालच्या दीनदुबळ्या नोकरांवरचा व कधी कधी घरांतल्या बायकापोरांनाच कर्दनकाळ ! काय ही आत्मवंचना ! श्रीमद्भगवद्गीता मुखोद्गत आहे, व्याख्यानांवर आणि कीर्तनावर झोड दिलेली आहे, आणि गडी पहावा तर आपल्या उपरींपुढे 'यस यस' करीत शरीर धनुष्याकृती, असा दीनवाणा उभा ! श्री काशीक्षेत्राचे प्रसिद्ध ब्रह्मीभूत श्री भास्करानंद सरस्वती यांना त्यांच्या एका शिष्याने असाच सवाल केला. त्याला महाराजांनी जबाब दिला. आपले लोक श्री गीतेचे पठण करीतात, पण त्याप्रमाणे आचरण ठेवीत नाहीत, म्हणून आपले पतन. पाश्चात्य लोक श्री गीतेचे पठण करीत नाहीत, पण तिच्या शिकवणींचे आचरण ठेवितात, सबब त्यांचा उत्कर्ष.

सन १९१७ सालची गोष्ट. दसरा आणि कोजागरी श्री

साईबाबांच्या पायापाशी करून माझा मित्र मुंबईला परत आला. त्याच दिवशी त्याच्या दुखणाईत मालकाकडून श्रीची पुन्हा भेट घेण्यासाठी हुकूम झाल्यावरून तो शिर्डीला बायकोसह त्याच रात्री पुन्हा गेला. तेथे तीनचार दिवस राहून परत येते वेळी श्रीची परवानगी घेताना त्यांना रडू कोसळले. बिचाऱ्याच्या स्वप्नीही नव्हते की, ही आपली श्रींच्या चरणांची शेवटची भेट. कारण श्री साई माऊलीने पुढच्या वर्षाच्या दसऱ्याला आपला देह ठेवला. त्याच्या डोळ्यांतून एकसारखे पाणी वाहत आहे असे पाहून बाबा म्हणाले, ''असं काय रे येड्यावाणी करतोस ? मी तिकडे तुझ्यापाशी नाही का ?'' मित्र म्हणाला, बुद्धीनं कळते पण अनुभव नाही. बाबा म्हणाले जा मी तुझ्यापाशी तिकडे आहे, तुला माहीत आहे. मग असं काय करतोस ?

असे आश्वासन दुसरे कोण देईल बरे ? या आश्वासनाच्या आधारावर माझा मित्र आपला जीवनक्रम चालवीत आहे.

आता आपण मूळ मुद्यावर येऊ. New Psychology न्यु सायकॉलॉजी अथवा Auto Suggestion ऑटोसजेशन आत्मनिवेदन, आत्मसूचन, हे काय आहे ? पाश्चात्यांनी मानसशास्त्राच्या आधाराने मनुष्याचा जीवनक्रम कसा सुखावह करता येईल, लहानथोर दुखणाइतांना, व्याधिग्रस्तांना, त्यांच्या मनाला उत्साहपूर्वक आधार आणि स्फूर्ति देऊन स्वल्प सायासाने त्या दुखण्या अथवा व्याधींपासून मुक्त करून त्यांचा आयुष्यक्रम सुख समाधानाने त्यांना कसा ठेवता येईल हे पाश्चात्यांचे नवे मानसशास्त्र शिकविते. याला इंग्रजी ऑटोसजेशन असे नाव देण्यात आले आहे. याचा समावेश श्रीनारदांच्या भक्तिसूत्रांत वर्णन केलेल्या आत्मनिवेदन भक्तीत करता येतो.

मोंशियर कोए या नावाच्या एका फ्रेंच गृहस्थाने फ्रान्समध्ये नानसी या गावाजवल एक संस्था स्थापन केली आहे. सन १९२१ पासून त्याचे प्रयोग प्रसिद्धीस येऊ लागले. आणि आजमितीस त्याच्याजवळ शेकडो डॉक्टर आणि इतर स्त्री-पुरुष त्याची चिकित्सा पद्धती आणि त्यावर उपाय करण्याची रीत शिकून इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, रशिया वगैरे सर्व देशांत, त्याच्या उपायपद्धतीची योजना करीत आहेत. मोंशियर कोए आणि त्याचे काही अनुयायी, या उपचारांबद्दल कोणाकडून एक पैसाही मोबदला घेत नाही.

मोंशिएर कोएयांच्या प्रयोगाने संधीवाताने हातपाय जखडलेली, क्षयरोगाने अंगाला व्रण पडलेली, डॉक्टर लोकांनी महिन्यावर महिने उपचार करून असाध्य म्हणून बरे होण्याविषयी निराश झालेली, अशी हजारो बालके व स्त्री-पुरुष बरी केली आहेत. ते पाहून सर्व पाश्चात्य जग आश्चर्य करीत आहे. कोए चे प्रयोग अत्यंत साधे आहेत, आणि ते कोणालाही स्वल्प रीतीने अनुकरण करण्यात येण्याजोगे आहेत. कोए याच्या प्रयोगाची मुख्य भिस्त दुखणाईताच्या आत्मभावनेला उत्तेजन देण्याकडे आहे. जागृत अवस्थेपेक्षा आपल्या निद्रिस्थ स्थितींत आत्मशक्तीचा विलक्षण जोर असतो हे त्याने जाणले. जागृत अवस्थेतल्या आत्मशक्तीपेक्षा निद्रिस्थ अवस्थेंतली आपली नैसर्गिक आत्मशक्ती अनेक पटींने बलवान आहे हे तत्त्व त्याने अनुभवून पाहिले आणि त्यासाठी जागृत अवस्थेत असता, इच्छाशक्तीवर यत्किंचित् ताण न देता, कल्पनायुक्त भावनेवर (Imagination) भिस्त ठेवून, झोपी जाण्याच्या, तसेच निजून उठण्याच्या संधीचा फायदा घेऊन त्या संधीच्या वेळी त्या भावनेवर विश्वास ठेविला असता, शरीरावर व मनावर आश्चर्यकारक परिणाम होऊन, असाध्य रोग बरे होतात इतकेच नाही, तर त्या मनुष्याचा आत्मविश्वास वाढून त्याचे आत्मबळ त्याच्या पुढील वर्तनावर दिसून येते. आत्मविश्वास वाढविण्याची ही कोए यांनी अति उत्तम, बिन पैशाची युक्ती शोधून काढली आहे. तिचा जरूर सर्वांनी उपयोग करावा. या युक्तीमध्ये परमेश्वरावर भरंवसा असला तर त्वरित फायदा होतो असे त्यांचे मत आहे.

आपले योगशास्त्र तरी हेच शिकवीत आहे. समाधी आणि निद्रा या दोन स्थितीमध्ये फारच किंचित पण अतिशय अवघड असा फरक आहे. याला बाबा भिंत, खई वगैरे शब्द योजीत असत. सुमारे १९१५ सालची गोष्ट. माझ्या मित्राची बायको आणि त्याचा धाकटा मुलगा मे महिन्याच्या सुटीचा फायदा घेऊन शिरडीस गेले.

एके दिवशी सहज बोलताना बाबा म्हणाले, ''आये मला तुझ्या घरी दिवसातून तीनतीनदा यावे लागते.'' बाई म्हणाल्या, ''होय बाबा.'' तेव्हा तेथे एक बाई होत्या त्या म्हणाल्या ''बाबा तुम्ही काही तरी बोलता ! आम्ही तुम्हाला येथे हमेशा बसलेले पाहातो आणि तुम्ही या बाईंच्या येथे तीनतीनदा जातो हे कसें ? हे काही तरी बोलता !'' बाबा म्हणाले, ''मीं खोटे बोलत नसतो. मी महालक्ष्मी आहे. आये मी तुझ्या घरी येतो, तू मला जेऊ खाऊ घालतेस, खरं ना ?'' माझ्या मित्राची बायको म्हणाली ''होय बाबा,'' तेव्हा त्या शिर्डीकर बाई बोलतात, ''बाई, बाबा तुमच्याकडे खरेच येतात आणि त्यांना जेऊ घालता ?'' मुंबईकर बाई म्हणाल्या, ''होय,'' मित्राच्या मुलांकडे वळून बाबा म्हणाले,''काय रे मी तुझ्या घरी येतो ना ?'' तो म्हणाला, ''होय बाबा'' तेव्हा त्या

शिर्डीकर बाईकडे वळून बाबा म्हणाले, ''अग आये मी असा सरळ जातो भाऊंच्या घराकडे, मध्ये भिंत आहे. तिच्यावरून उडी मारली की रेलगाडीचा रस्ता आहे आणि मग भाऊंच घर. होय ना भाऊ ?'' येथे मुलगा म्हणाला ''नाही बाबा आधी घर लागते मग आगगाडी'' बाबा म्हणाले, ''आधी आगगाडी मग घर. तुझे चुकते तू विचार कर'' मुलगा बराच वेळ गोंधळात पडला. त्याच्या घराचे पुढीलदार पश्चिमेकडे, घराची मागची बाजू पूर्वेकडे, आगगाडीचा रस्ता पूर्वेकडे, आणि पूर्वेकडे श्री शिरडी. काही वेळाने त्याची समजूत झाली की बाबांना जेवताखाता, चहा पिता, पूजा आरती करता, नैवेद्य दाखविता जेव्हा जेव्हा तो आणि त्याची आई संकल्प करून ती खाण्याची वस्तु श्री शिर्डीकडे तोंड करून श्रीसाईमाउलीला मनोभावाने आधी अर्पण करून नंतर ते पदार्थ त्यांचा प्रसाद म्हणून सेवन करीत त्या त्या वेळी त्या दीनवत्सल गुरुमाऊलीला ते कळून येऊन त्याचा ते स्वीकार करीत असत. वात्सल्यप्रेमाने कळवळा येऊन, या साध्याभोळ्या भक्तांचा भाव जाणून, आपले त्यांच्या विषयीचे प्रेम बाबांनी वरील संवादाने व्यक्त केले.

यावरील संवादाप्रमाणे इतर तशाच प्रकारच्या अनुभवाविषयी श्री साईमाऊलीच्या स्फूर्तीनुरूप पुढे एखादे प्रसंगी विवेचन करण्यात येईल.

श्रीसाईबाबां या सहजसमाधिस्थितीच्या स्पष्टीकरणासाठी ''खईवरून भिंतीवरून उडी मारावी लागते'' असे शब्द वेळोवेळी वापरीत असत.

समाधी आणि निद्रा या दोन स्थितीत जाण्याचा मार्ग स्थूल मानाने बोलावयाचा म्हणजे एकच. साधारण मनुष्य चित्त एकाग्र होता क्षणीच झोपी जातो. योगी चित्त एकाग्र होता क्षणीच झोप चुकवून समाधी स्थितीत जातो. समाधीमध्ये देहाचा विसर असतो, पण चिद्शक्तीची पूर्ण जाणीव असते. निद्रेत देहाचा विसर असतो, चिद्शक्तीचे चलन असतेच, पण जाणीव नसते.

योगशास्त्रांनी सांगितलेली ही स्थिती आम्ही ही पुस्तकी व बिकट गोष्ट म्हणून अनुभवात आणण्याची खटपट करीत नाही. आणि तेच पाश्चात्य लोक योगशास्त्राचे काहीही ज्ञान नसता, या आपल्या प्रत्येकाच्या अंतर्गत असलेल्या चिद्शक्तीचा साधारण व्यवहारात कसा उपयोग करून घेतात याचे काए यांचा प्रयोग हे एक उत्तम उदाहरण आहे. आम्ही गतवैभवाच्या पोकळ बडबडी करीत, आपल्या स्वतःच्या घरात असलेल्या या अफाट सामर्थ्यरूप द्रव्याविषयी आंधळ्या भिकाऱ्याप्रमाणे वागत आहोत. आणि ते लोक अशा प्रकारचे ज्ञान संपादन



करून ते व्यवहारात उपयोगात आणून, जनतेला त्याचा फायदा देऊन, जनतेचे कोट कल्याण करण्यासाठी निरपेक्ष बुद्धीने कशी धडपड करीत आहेत याचा प्रत्येकाने सूक्ष्म विचार करावा. विजयश्रीने त्यांच्या गळ्यात माळ का घालू नये ! त्यांचा उत्कर्ष का होऊ नये !

कोए म्हणतो आपण भावना उत्पन्न करावी की, '' Day by Day in every way, I am getting better and better म्हणजे ''दिवसेंदिवस सर्व प्रकारे माझी स्थिती सुधारत आहे.'' इच्छाशक्तीवर मुळीच भार द्यावयाचा नाही, हा विचार मनात विश्वासपूर्वक आणावयाचा इतकेच. त्यात ज्याचा देवावर अथवा सद्गुरूवर भरवसा असेल त्याने ''दिवसेंदिवस'' या शब्दांपुढे ''देवाच्या'' अथवा ''सद्गुरूच्या कृपेने'' हे शब्द उच्चारावे. जसे ''दिवसेंदिवस देवाच्या (अथवा सद्गुरुच्या) कृपेने सर्व प्रकारे माझी स्थिती सुधारत आहे.'' मोठ्याने बोलण्याचे कारण नाही. ही भावना मनात विश्वासपूर्वक ठेवावयाची, आणि ती जागृत अवस्थेपेक्षा, झोपी जाण्यापूर्वी अथवा झोपेतून उठतेवेळी जरूर मनात आणल्यास विशेष परिणामकारक होते. या भावनेने शरीरप्रकृति आपोआप सुधारते. शरीरातल्या व्याधी दूर होतात. स्वाभाविक रीतीने नवा जोम उत्पन्न होतो. त्यामुळे आत्मविश्वास दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊन हाती धरलेली कार्ये सुरळीत पार

# नामजप-'एक ऊर्जा स्रोत'

– केशव पटवर्धन

मंगळवेढा हे गांव अनेक संतजनांची भूमी म्हणून ओळखले जाते. श्री संत दामाजी पंत, श्री संत चोखामेळा, संत कान्होपात्रा, तसेच, श्री स्वामी समर्थ अक्कलकोटला प्रयाण करणेपूर्वी बरेच दिवस मंगळवेढ्यात निवासस्थित होते. त्याचप्रमाणे श्री सिताराम महाराजांचेही वास्तव्य मंगळवेढ्यास काही वर्षे होते.



अशा अनेक वेगवेगळ्या संतांच्या कथा, लोककथा, श्रद्धेने जपल्या जातात. एकमेकांना सांगितल्या जातात. तशीच एक कथा सांगितली जाते की, मंगळवेढा गावाच्या गावकुसाचे बांधकाम चालू असतानाच ते गावकुस ढासळले व त्या अपघातामध्ये श्री संत चोखामेळा महाराज परलोकवासी झाले. ती घटना जेथे घडली तेथील श्री संत चोखोबांच्या समाधीचे दर्शन आजही लोक भाविकतेने घेतात.

अशा या संतश्रेष्ठांच्या अस्थी आणण्यासाठी खुद्द श्री. पांडुरंगानीच श्री नामदेव महाराजांना मंगळवेढ्यास पाठविले. अर्थात त्या अस्थी ओळखायच्या कशा ? याची खुण सांगताना पंढरीरायांनी श्री. नामदेवाना सांगितले की, ज्या अस्थीमधून 'श्री विठ्ठल-जय हरि विठ्ठल' असा नामघोष ऐकू येईल त्याच त्या अस्थी श्री संत चोखोबारायाच्या आहेत असे समज. अशा प्रकारे अस्थी गोळा करून त्यांना प्रत्यक्ष श्री विठ्ठलांनी समाधी दिली. आजच्या विज्ञान युगात हीकथा काल्पनिक वाटते. परंतु ज्यांनी श्री. संतश्रेष्ठ अशी उपाधी मिळविली त्यांचेबाबतीत ही गोष्ट काही अशक्य नाही.

कोणत्याही मानवाला जेव्हा एखाद्या गोष्टीचा निजध्यास लागतो 'जळी स्थळी काष्ठी पाषाणी' तीच गोष्ट दिसते, भासते, तेव्हा ती त्याच्या शरीरात, मनात भिनते व त्यालाच ''अजाप जप'' असे अध्यात्मिक दृष्ट्या म्हटले जाते.

अशीच कथा प्रभु श्री रामचंद्र व श्री हनुमंत यांच्यामधील आर्तभक्तीची आहे. वनवासामधून परत अयोध्येस आल्यानंतर श्री मारुतीरायांना श्री. माईंनी गळ्यातील रत्नांचा हार त्यांनी केलेल्या कामगिरीची आठवण म्हणून भेट दिला, परंतु श्री हमुमंतांनी त्या प्रत्येक रत्नाला दाताखाली फोडून त्यात श्री रामचंद्रांचे कोठे आत्मदर्शन होते काय ? हे अनुभविण्याचा प्रयत्न केला व शेवटी ते सर्व निव्वळ फोल मानून आपल्या हृदयामधील श्री प्रभु रामचंद्रांची मानस प्रतिमा विराजमान झालेली सर्वांना दाखविली.

अशाच प्रकारची श्री भगवान श्रीकृष्ण व अर्जुन यांच्यामधील अद्वैताची सांगितली जाते. त्यामुळेच प्रत्यक्ष श्री भगवान श्रीकृष्णासारखा सखा व सारथी श्री अर्जुनाला लाभला. अशाच प्रकारच्या अध्यात्मिक आत्मिक समाधानाची गोष्ट वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध करणे अशक्य आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास ज्याप्रमाणे एखादा माणूस भर उन्हात हिंडून दमून आल्यानंतर त्याला पाण्याची नितांत गरज भासते, त्यावेळी त्याला नुसत्या साध्या पाण्यापेक्षा थंडगार पाणी पिण्यासाठी मिळाल्यास अधिक समाधान वाटते. त्याचबरोबर तेच थंडगार पाणी एखाद्या गर्द छाया वृक्षाखाली बसून वाऱ्याच्या झुळकेबरोबर पिण्यामध्ये पराकाष्ठेचे समाधान मिळते. यात वैज्ञानिकदृष्ट्या पाहायचे झाल्यास त्या माणसाचे पाणी पिण्याअगोदरचे वजन अधिक पाण्याचे वजन यांच्या बेरजेइतके पाणी पिल्यानंतरचे वजन असा फरक जाणवेल, परंतु त्या वजनाचे फरकामध्ये त्या माणसाने साधे पाणी पिणे अथवा थंडगार पाणी पिणे यामधील मानसिक समाधान गर्द वृक्ष छायेखाली बसुन पाणी प्यायल्या नंतर होणारे अधिक मानसिक

समाधान प्रत्यक्ष वजनाच्या काट्यावर दिसू शकणार नाही. आणि यालाच आत्मिक समाधान असे अध्यात्मिकदृष्ट्या म्हणता येईल.

अर्थात आत्मिक समाधान ही गोष्ट प्रत्येक जीवधारी प्राण्यास लागू होते की, जी परंतु वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध करणे अशक्य असते. याची प्रत्यक्ष अनुभूती फक्त ज्याची त्यालाच घेता येते.

श्री परमेश्वराची मूर्त कल्पना व्यक्ताकडुन अन्वक्ताकडे या भावनेतून निर्माण झाली आहे. 'निर्गुण निराकार अनादी अनंत' अशा अनामिक शक्तीला सगुण साकार मुर्त स्वरुप दिले आहे. कारण सर्वसामान्यपणे श्री ईश्वराची भावभक्ती करताना अमूर्त स्वरूपात भक्ती करण्यासाठी जेवढी उच्च मानसिक पातळी आवश्यक आहे, तेवढी सर्वसामान्यपणे निर्माण होवू शकत नाही. म्हणून सगुणाकडून निर्गुणांकडे वाटचाल करणे हा सोपा उपाय स्वीकारला आहे.

श्री परमेश्वर हा एक ऊर्जास्त्रोत मानला जातो. पंच महाभुतांमधून निर्माण झालेली सृष्टी ही वेगवेगळ्या ऊर्जा स्त्रोताची प्रातिनिधिक आहे. त्यामुळे अशा वेगवेगळ्या ऊर्जा स्त्रोतांचे एकत्रित स्वरूप श्री परमेश्वर स्वरूपात एकवटलेले आहे.

मानवाचे शरीर हेही पंचमहाभुतांमधून निर्माण झाले आहे. व त्या पंचमहाभुतांच्या ऊर्जा स्त्रोतातच एक भाग आहे. अशा ऊर्जा स्त्रोतामधून शक्ती निर्माण होते व शक्तीचे अविनाशत्व हे तत्त्व विज्ञानाच्या सिद्धांतानी मान्य केले आहे, स्वीकारले आहे. ज्याप्रमाणे आज पाणी, वारा, व समुद्राच्या पाण्याच्या लाटांपासून वीज निर्माण करणे शक्य आहे हे आपण प्रत्यक्ष अनुभवतो आहोत. अशा प्रकारे पंचमहाभुतांच्या ऊर्जा स्त्रोतामधून निर्माण झालेले मानवी शरीर हे परत दुसऱ्या ऊर्जा स्त्रोतात समाविष्ट होणे आवश्यक आहे, गरजेचे आहे.

अशा प्रकारे जेव्हा मानवी मन ज्यावेळी प्रत्यक्ष श्री. परमेश्वराचा निजध्यास घेते त्यावेळी त्याच्याशी एकरुप होते. की, ज्याला आध्यात्मिकदृष्ट्या 'अजापजप' म्हटले जाते. त्या अत्युच्च अवस्थेस श्री चोखोबा महाराज पोहोचले असल्यामुळे मला असे वाटते की, श्री चोखोबाच्या अस्थीमधून त्यांच्या मृत्यूनंतरदेखील ''श्री विठ्ठल जय हरि विठ्ठल'' हा ध्वनी ऐकू येणे अशक्य नाही व लोकांकडे मागे जी लोकांची श्रद्धा आहे ती गोष्ट प्रत्यक्ष घडणे अवघड नाही. कारण श्री चोखोबांची थोरवी गाताना श्री संत एकनाथ महाराज म्हणतात-

**अमृतासी रोग स्वर्गी जाहला पाही।**
**अमरनाथा तोही गोड नसे ॥**

**नारदासी प्रश्न करी अमरनाथ।**
**शुद्ध हे अमृत कोठे होय ॥**

**चोख्याचे अंगणी बैसल्या पंगती।**
**स्त्रीते वाढती चोखियाची ॥**

**अमृताचे ताट इंद्रे पुढे केले।**
**शुद्ध पाहिजे केले नारायण ॥**

**तेव्हा देवराय पाचारी चो खियासी।**
**शुद्ध हे अमृतासी करी वेगी ॥**

**चोखामेळा म्हणे काय हे अमृत।**
**नामापुढे काय मात याची ॥**

**अमृताचे ताट घेवुनी आला इंद्र।**
**हेतु गा पवित्र करी वेगी ॥**

**चोखियाची स्त्री चोखा दोघेजण।**
**शुद्ध अमृत तेणे केले देखा ॥**

**चोखियाच्या घरी शुद्ध हो अमृत।**
**एका जनार्दन मात काय सांगू ॥**

थोडक्यात- श्री चोखोबांची भक्ती किती पराकोटीला गेली होती याचे वर्णन करताना श्री संत एकनाथ महाराज म्हणतात की, अमृत शुद्ध करण्याकरिता इंद्रादी देवांनीसुद्धा या जेवणाच्या पंक्तीचा लाभ घेतला.

म्हणूनच ऊर्जास्त्रोताच्या एका स्वरूपातून दुसऱ्या स्वरुपात विलीन होताना, म्हणजे श्री पांडुरंग स्वरुपात विलीन होताना ''श्री विठ्ठल जय हरि विठ्ठल'' म्हणणाऱ्या अस्थी आणणारे श्री नामदेव महाराज म्हणतात- नामदेव अस्थी आणिल्या परखोनी।

**घेत चक्रपाणी पितांबरी ॥**

म्हणजेच त्या अस्थी श्री पांडुरंगरुपी परमेश्वराच्या ऊर्जा स्त्रोतात विलीन झाल्या अशी भाविकांची श्रद्धा आहे. ती सर्वांनाच मान्य होईल असे वाटते.

# नाचू कीर्तनाचे रंगी

डॉ. ग. वा. तगारे

हरिकीर्तन ही सामुदायिक आध्यात्मिक साधना आहे. वक्ता (कीर्तनकार) आणि श्रोते तल्लीनतेने नामसंकीर्तनात भान विसरून डोलू लागतात तेव्हा **'कथा निरूपणे समाधी लागली'** वा समर्थोक्तीचा प्रत्यय येतो.

अनेकांना वाटते की ही परंपरा ज्ञानदेवादी संतांनी सुरु केली. पण ही परंपरा - या कीर्तन गंगेचा उगम वेदकाळात आहे. त्या वेदकालीन ऋषींना देवाची सर्वच नामे वंदनीय आणि यज्ञीय वाटतात.

**विश्वाहि वो नमस्यानि वन्द्या**
**नामानि देवा उत याज्ञियानि ॥**

या ऋषीला नामसंकीर्तन हा इतर वैदिक यज्ञाप्रमाणे एक 'नामयज्ञ' आहे असे वाटत असावे.

(ऋग्वेद, १०.६३२) केवळ या ठिकाणी नव्हे तर ऋग्वेदात इतरत्र (उदा. १.१५६.३, ७.२२.५, ८.११.५ इ.) सुद्धा नामसंकीर्तनाचे माहात्म्य दर्शक वचने आहेत.

वेदकाळातून आपण जेव्हा पुराणकाळात येतो तेव्हा कीर्तनमाहात्म्यगंगेला पूर लोटल्यासारखी वचने आढळतात. उदाहरणार्थ विष्णुपुराण सांगते, ''कृतयुगात जे ध्यानमार्गाने मिळते, त्रेतायुगात यज्ञाने, व्दापरयुगात पूजाविधानाने ते कलियुगात केवळ संकीर्तनाने मिळते''.

**ध्यायन कृते, यजन यज्ञैस्त्रेतायां द्वावरेऽर्थयत्र् ।**
**यदान्पोति तदान्पोति कलौ संकीर्त्य कीर्तनम् ॥**

(विष्णुपुराण, ६.२.१७)

'' पापाचा पूल लोटला तरी तो हरिकीर्तनाने नाहीसा होतो,'' अशी विष्णुधर्मोत्तरपुराणाने ग्वाही दिली आहे. ते पुराणकार म्हणतातः

**शान्तिःकलौ ह्यघौघस्य नामसंकीर्तनाद् हरेः।**

घटपटांचे पांडित्य, रस-अलंकारादींचे प्राचुर्य असलेले विवेचन यापेक्षा हरिकीर्तनात भक्तिभाव आवश्यक आहे. भक्तिभावशून्य.पांडित्यपूर्ण विवेचनाला 'काक-तीर्थ' असे संबोधून श्रीमद्‌भागवतकार म्हणतातः ''कीर्तनकारांची वाणी किंवा उच्चार अशुद्ध असले तरी चालतील, कारण भगवंताच्या




यशाचे गायन असणाऱ्या शब्दावर परमेश्वरी नाममुद्रा असल्यामुळे जनतेच्या पापांचा नाश होतो.

**यद् वाग्-विसर्गो जननाघविपुवो ॥**
**यस्मिन् प्रतिश्लोक मबद्धवत्यपि ।**
**नामान्यनंतस्व यशोंऽकितानि ।**

(श्रीमद् भागवत १५.११)

या भागवतवचनाचा अनुवाद तुकारामानी **'वेडे वाकुडे गाईन । परी तुझा म्हणवीन'** या शब्दांत केला आहे.

ज्ञानदेवांचे काळापासून आजपर्यंत अनेक मराठी संतांनी कीर्तनभक्तीचा अभूतपूर्व गौरव, प्रचार व प्रसार केला आहे.

नामदेव आत्मविश्वासपूर्ण शब्दांत सांगतातः

**बोलू एसे बोल । तेणे बोले विठ्ठल डोले**
**नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।**

श्रीमद्‌भागवताच्या एकादश स्कंधातील **'गृण्वन् सुमद्राणि रंथागपाणेः'** (२.३९) वरील एकनाथांचे विवेचन पाहाः

**कीर्तनाचा घडघडाट।**
**आनंदु कोंडला उद्‌मट।**
**हरुषे डोले वैकुंठ पीठ।**
**तेणे सुखे नीळकंठ तांडव नाचे॥**
**यापरी हरिकीर्तन।**
**देत परम समाधान।**
**हा भक्ति-राजमार्ग पूर्ण।**
**ये मार्गी रक्षण चक्रपाणी कर्ता॥**

-एकनाथी भागवत २.५४२-४३

तुकारामांचा अनुभव : कीर्तनामुळे आपले शरीर हरिरूप होते.

**कीर्तन चांग कीर्तन चांग। होय अंग हरिरुप॥**

(तुकारामगाथा ९०६) रामदासानी दासबोधात नवविधा भक्तीच्या दशकात कीर्तन भक्तीबद्दल ठामपणे ग्वाही दिली आहे.

**कीर्तने महादोष जाती। कीर्तने होय उत्तम गती।**
**कीर्तने भगवत्प्राप्ती। यदर्थी संदेह नाही।**

कीर्तनपरंपरेचे संस्थापक नारद आहेत असे मानले जाते. पण नामकीर्तन भक्ती वेदकाळा इतकी प्राचीन असल्यामुळे, पुराणळात होऊन गेलेले किंवा पुराणात वर्णन केलेले ते नारद कालदृष्ट्या वेदकालीन होऊच शकत नाही. नारद हे एका कलिप्रिय, गानतज्ञ मुनीचे नाव असेल पण 'नारद' हे विशेषण-पदवी आहे. 'नारद' या शब्दाची व्युत्पत्ती देताना 'शब्दकल्पद्रुम' या प्रख्यात कोशात म्हटले आहे "**नारं ब्रह्मज्ञानं ददाति इति**" 'जो ब्रह्मज्ञान देऊ शकतो तो नारद. यात जातपातीचा प्रश्न नाही. ब्रह्मज्ञान ही कुणाची हःम मक्तेदारी होऊ शकत नाही. उपनिषत्कालीन रैक्व आणि इतिहासकाळातील 'चोखामेळा' यांना ही पदवी देण्यात संकोच नसावा. कारण 'ब्रह्मज्ञानाचे विवेचन करू शकणारा' ही कीर्तनकाराची पदवी वरील व्युत्पत्तीने निश्चित होते. अन् त्याचबरोबर 'ब्रह्मज्ञानचर्चा' हा कीर्तनाचा विषय निश्चित होतो. 'संतती-नियमन', 'दारु बंदी' अशा विषयावर कीर्तन करणे हे त्या प्राचीन पवित्र संस्थेचे विडंबन आहे.

दुर्दैवाने ही भक्ति-ज्ञान परंपरा लोपत चालली आहे. हिला बाजारू, करमणुकीचे स्वरूप येऊ लागले आहे. ज्ञानदेव-नामदेवांचे काळापासून आमच्या संतांनी समाजाला नैतिक व धार्मिक वळण देण्यासाठी 'कीर्तन' या माध्यमाचा उपयोग, यशस्वीपणे केला होता. अनाचार आणि भ्रष्टाचार यांनी बरबटलेल्या समाजाला नैतिकता आणण्यासाठी या माध्यमाचा जाणीवपूर्वक उपयोग करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

□□□

# मुखी दत्त रे दत्त म्हणा

दत्तराज हा पूर्ण विरागी
अवधूत हा सन्यासी
दत्त दिगंबर स्वामी माझा
पूर्ण ब्रह्म अविनाशी...... ॥१॥

अनसूया नंदन, दत्तपुत्र हा
दाता त्रैलोक्याचा
स्मरणमात्रे हा उभा ठाकतो
दत्त प्रभु भक्तांचा...... ॥२॥

दत्तच माता, पिता दत्त मज
सखा स्वामी जीवनाचा
दत्त स्मरा रे दत्त धरा रे
हा आधार त्रैलोक्याचा...... ॥३॥

दत्त देखता काळ कापतो
भितिनुरे मरणाची
नामस्मरणे 'नाव' करा
हा भवसागर तरण्याची...... ॥४॥

जे जे मागू ते ते देतो
नाम तयाचे दत्त
चरणी तयाचे दत्त
चरणी रहा रे उभे जोडोनी
आपले दोन्ही हात...... ॥५॥

भ्रमंती करतो दाही दिशांना
भक्ता ह्रदयी वस्ती
दत्त देवता सदैव करते
भक्तावरती प्रीति...... ॥६॥

ज्यांनी धरिला ह्रदयी
काळाचे भय ना उरले
दत्ताविण ना कलियुगीया
दैवत अन्य थोरले...... ॥७॥

कलीयुगी या सत्ता ज्याची
तो दत्त 'गजानन' स्मरतो
ब्रह्मा, विष्णु आणि महेशा
साष्टांगाने नमितो...... ॥८॥

■ **ग. के. कुलकर्णी**
**रत्नागिरी.**

○○○


# सगुण-निर्गुण वाद

– एस.ए.कुलकर्णी

ईश्वर सगुण आहे किं निर्गुण? सगुणोपासना इष्ट किं निर्गुणोपासना इष्ट ? सगुण उपासनेनं मुक्ती मिळते किं निर्गुण उपासनेन? या प्रश्नावर नेहमी खल होत असतो. प्रामुख्याने विद्वज्जनांमध्ये. या संदर्भात संत-सत्पुरुषांनी काय विचार प्रगट केलेले आहेत याचा विचार प्रथम आवश्यक वाटतो. **निवृतीनाथ** म्हणतात-'**साकार निराकार हे ब्रह्मीचे विकार । तेथील अंकूर गुरुराज।।**'(अ.१४२),'**सर्व हरि दिसे ज़नी वनी वसे। भावदृश्य भासे भक्तजना**'।।(अ.२७४) साकार आणि निराकार हे एकाच सृष्टीकर्त्याचे विकार आहेत, रुपें आहेत,हे ज्ञान गुरु देतात. ईश्वर जनीवनी सर्वत्र व्याप्त आहे, जसा भक्ताचा भाव, तसा तो प्रचित होतो. ज्ञानदेव म्हणतात-'**सगुणीं निर्गुण निर्गुणीं सगुण। दोन्ही भिन्नपण नसे मुळीं।।**'(अ. ८८५) '**सगुण निर्गुण दोन्ही विलक्षण। ब्रह्म सनातन विठ्ठल हा।।**'(अ९६६) '**सगुण अंबुला निर्गुण पैं जाला। धराचार समस्त बुडविला।।**'(अ ७१०)सगुण-निर्गुण दोन्ही एकच. त्यांत भेद नाही. सगुण व निर्गुण हे दोन्ही प्रकार विलक्षण आहेत. सगुण व निर्गुण हे दोन्ही प्रकार विलक्षण वाटत असले तरी मूलतः ईश्वर एकच आहे.सगुण तोच निर्गुण आहे **सोपानदेव** म्हणाले,'**सर्व घटी रुप समसारखे। म्हणोनिया ते सोये आम्हा भक्तां** ।।(अ४) ईश्वर सर्वत्र आहे, तोही सम स्वरुपात, यादृष्टीनें भक्ति करणे सोयीचे ठरते. **मुक्ताई** म्हणते-'**निर्गुणाची सेज सगुणाची बाज। तेथे केशिराज पहुडले।।**'(अ१६) चांगदेव म्हणतात-'**साकार पूजिता विराकार जालें। शून्यी बुडाले बाईये वो।।**'(अ४८) साकाराची पूजा करता करता निराकाराचा अनुभव आला, अंती सार शून्य(पोकळी) अनुभूत झाले. संत **नामदेव** पुर्णतःया विठ्ठल भक्त असूनही म्हणतात-'सर्वाभुति पाहें एक वासुदेव । पुसोनिया ठाव अहंतेचा।।'ईश्वर सर्वाभुति स्थित आहे याची प्रचिती घेण्यासाठी स्वतःबद्दलचा अहंकार संपविला पाहिजे असे त्याचेस्पष्ट मत आहे. **तुकोबाराय** म्हणाले,'**विष्णूमय जग वैष्णवाचा धर्म। भदाभेद भ्रम अमंगल।। कोणीही जिवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे।।**'ईश्वर सर्वत्र प्रतीत आहे,तिथे भेदाभेदाला थारा नाही. कुणाचाही मत्सर न करणे हेच सर्वेश्वर पुजेचे नेमके वर्म आहे. **चोखामेळा** म्हणतात-'**देवा नाही रुप देवा नाही नाम । देव हा निष्काम सर्वा ठायी।।**'- ईश्वराला नाव -रुप नाही तो निगुण असूनही सर्व चराचरां मध्ये सगुण रुपाने स्थित असतो. **एकनाथ** महाराज म्हणतात-'**निर्गुण निराकार तोचि जगीं पै ईश्वर। अभेदाचे उत्तम गुण । तेचि भक्त तेचि ज्ञान।।**'ईश्वर निर्गुण-निराकारी रुपात संपूर्ण विश्वामध्ये स्थित आहे. तेव्हा भेदाभेद न मानणें हेच उत्तम. ही जाणीव म्हणजेच खरी भक्ति-हेच खरे ज्ञान. **शेख महंमद** म्हणतात-'**ज्यासि नाही रुप रेखा । तो अव्यक्त माझा सखा** ।।'रुप रेखा नसलेला ईश्वर हा निर्गुणी असूनही मला सखा भासतो. **कबीर** म्हणतात-'**कहत कबीर सुन भाई साधु मनकी माला जपता है। जो भार भगतसे ध्यान करत है, उनकु साहब मिलता है** ।।'भाव भक्तिनें ध्यान धारणा केली म्हणजे ईश्वर अनुभुत होतो. **गोरा कुंभार** म्हणाले,'**निर्गुणाचे भेटी आलो सगुणा संगे तव झालो प्रसंगे गुणातीत.**'

या सर्वच विचार सरणीमध्ये एक महत्वाचे सुत्र गुंफिलेल आढळतं. भक्ति निगुण असो वा सगुण अंतिम साध्य एकच आहे- सृष्टिकर्त्या ईश्वराशी 'एकरुप'होणं. आद्य जगदगुरु शंकराचार्यांनी अन्नपूर्णा,पांडुरंग, भवानी, राम, शिव, कृष्ण,भैरव ,हनुमान आदी देवतांची स्तोत्रें गायिली आहेत. म्हणजे ते केवळ सगुण भक्तिचे उपासक होते असं नाही,उलट ते ईश्वराशी एकरुप झालेले अद्वैती गुरुदेवच होते.ते ब्रह्मज्ञान नामावलीमध्ये म्हणतात-''**अहं साक्षिति यो विद्या द्रिविच्यैवं पुनःपुनःास एव मुक्तः सन विद्वानीतीवेदान्तडिण्डिमः।।**'' मी सर्व साक्षी परमेश्वर आत्मा आहे हे दृढ निश्चयाने जो जाणील, तोच खरा --, तोच सर्व संसार दुःखांतून मुक्त होतो. तोच संत म्हणजे ब्रम्हस्वरूप होय !

सर्वसाधारणपणें असं आढळतं की जें दृश्य आहे, तेंच सत्य मानलं जातं. **भगवद्गीतेंत** म्हटलेलं आहे - '**समोऽऽहं** सर्व भूतेषु न मे द्वेष्योंऽस्ति न प्रियः। ये भजनि तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ।।' यावर **ज्ञानदेव** विवरण करतात ते **वर्तत असति देहीं । परि ते देहिं ना माझें ठाइं । मी तेयांचा हृदयीं समग्रु असे ।। सविस्तर वटत्व जैसे । एक बीजकमिकामाजि असे । आणि बीजकालीका वसें । वटिं जेवि ।।**' (अ. ९) खरे संत, सत्पुरुष देहरुपाने जगत असतात खरे, परंतु ते देहीं रमलेले नसतात, ते रमले असतात



माझ्यामध्ये आणि मी त्यांच्यामध्ये स्थित असतो. वृक्षाचें मूळ 'बीज' आणि 'बीज' फळरुपांत वृक्षामध्येंच असंत असं हे स्वरूप आहे. जन्मलेल्या बाळाला नात्यागोत्यांची ओळख नसतेच, ते निरागस-निर्मल असते. पुढे थोडे फार त्याला कळू लागले म्हणजे ही आई, हे वडिल, हा भाऊ, ही बहीण आदी ज्ञान प्राप्त होते. **'इग्नरन्स ईज ए ब्लिस्'** अशी इंग्रजी उक्ति आहे. अजाणतेमध्येच आनंद असतो. जाणतेपणीं भेद निर्माण होतात. ब्रम्हस्वरूपांत जे रंगून गेलेले असतात, ते नवजात बालकाप्रमाणे निरागस-आनंदीच असतात. परमहंस रामकृष्ण एखाद्या बालकाप्रमाणेंच निर्विकार होते. **शिर्डीचे साईबाबा**, शेगांवचे श्री गजानन महाराज असेच बालस्वरूपी' वर्तन करीत असत. याचं कारण ते ब्रम्हज्ञानी होते. **'सबका मालिक एक'** ही **साईबाबांची** घोषणा होती, तर श्री गजानन महाराज म्हणत **'गण गण गणांत बोते'**, या बाबींचा मागोवा घेतला म्हणजेच सर्वव्यापी ब्रम्हस्वरूपाचे महत्व कळून येते. **स्वामी विवेकानंद** म्हणाले होते- 'माझ्या देशामध्यें तेहत्तीस कोटी देव मानले जातात. ते एका अर्थी बरोबर आहे. देशाची लोकसंख्या तेहत्तीस कोटी आहे. त्यांतील प्रत्येक व्यक्तिमध्ये मला ईश्वर दिसतो !' (तेव्हा देशाची लोकसंख्या ३३ कोटी होती.)

ब्रम्हस्वरुपी ईश्वर मानणारे आपले पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू एकदां महाराष्ट्रांतील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले होते. ते पंढरपूरला आले. त्यांच्या नियोजित कार्यक्रमामध्ये विठ्ठल मंदिराची भेट निर्देशित नव्हती. परंतु स्थानिक मंडळीच्या अति आग्रहामुळे नेहरू मंदिरांत गेले. नंतर चंद्रभागेच्या वाळवंटावर आयोजित केलेल्या लक्षावधी जनतेच्या सभेमध्ये भाषण करीत असतां, आरंभीच ते म्हणाले, ''यहाँ पंढरपूरमें एक मंदिर है. मैं अभी वहाँ गया था। आजकल मैं किसी मंदिरमें जाता नही। मैं मानता हूँ मेरा पूजनीय मंदिर ढाई हजार मिल लंबा-चौडा है-इस मंदिरमें रहनेवाली हरेक व्यक्ति मेरा ईश्वर है.'' त्यांची ही उक्ति भक्तिचीच द्योतक आहे. ती ब्रम्हस्वरूपाला मानणारी आहे.

ब्रम्हस्वरूपी ज्ञान सहजा सहजी प्राप्त होत नाही. सर्व सामान्य व्यक्तिला म्हणून त्याची श्रद्धा भक्ति कुठे तरी स्थित व्हावी म्हणून देव देवतांची प्रस्थापना होऊन मंदिरे निर्माण झाली - सगुण भक्तिसाठी, परंतु त्यामधून वैष्णव, स्मार्त, आदी वंशभेद परंपरा निर्माण झाल्या. वैष्णवांची एकादशी वेगळी, स्मार्तांची वेगळी आजही मानली जाते. एकाचे उभे गंध, एकाचे आडवे गंध, कुणी आषाढी एकादशीला पक्वानाचे भोजन करतील तर कुणी शिवरात्रीला मिष्ठान्न भोजन करतील. नरहरी सोनार शिवभक्त विठ्ठलाच्या मंदिरांत गेले ते आपल्या डोळ्यावर पट्टी बांधून घेवून-विठ्ठलाच्या कमरेचं कडदोऱ्यासाठी माप घेण्याच्या उद्देशाने, परंतु माप घेताना विठ्ठल मूर्ती स्पर्शाला शिवलिंगाप्रमाणे भासली - डोळ्यावरची

पट्टी काढल्यावर विठ्ठल मूर्ती दिसली, हा चमत्कार भक्तिविजयांत नमूद आहे. राजा बिज्जळ देवीभक्त होता तेव्हा अनुभव मंडपाची स्थापनात करणाऱ्या बसवेश्वरांना छळवाद सोसावा लागला. शिवभक्त व देवीभक्त या मध्ये चक्क लढाई झाली - हा इतिहास आहे, 'देव स्वर्गात आहे. असं मानणाऱ्या खिस्ती मंडळींनी चर्चमध्यें कुठलीही मूर्ति स्थापित केली नाही, पण 'क्रूस' चे प्रतिक ठेवलेच, कुठे 'मेरी' ची स्थापना केली. रोमन कॅथेलिक - प्रोटेस्टंट यांच्यामध्ये भीषण लढाया झाल्या क्रूसेड्स झाली. इंग्लंडमधील इतरेजनांना (खिस्ती) देश सोडून अमेरिकेत वास्तव्य करावे लागले. हाही इतिहास आहे. 'अल्लाह'ला मानणाऱ्या मुस्लिम देशामध्ये 'कर्बल'च्या लढाया झाल्या. शिया-सुनी पंथातील वादंग आजही चालू आहेच. ते मूर्तिपूजक नसले तरी नमाज पडतात ते मक्केच्या दिशेला तोंड करूनच. गौतम बुद्धत निर्गुण भक्त होते, तरी त्यांचे भक्त बुद्धाची पूजा करतातच, आणि मग अशा वादामधून राजकारणी खेळ सुरुं होलात. एका संतकविनं म्हटलेलं आहे- 'मंदिर तोडो मस्जिद तोडो ए तो सिर्फ मुजाका है। लेकिन किसीका दिल ना तोडो, यह मंदिर खास खुदाका है ॥' या उक्तिचा अनुभव या देशाने खूप गांठी बांधलेला आहे, आणखी एक सत्पुरूष म्हणाले, 'राम कहो रहिमान कहो, कृष्ण कहो महादेवने । पारसनाथ कहो कुई ब्रम्हा, सकल ब्रम्ह स्वयंमेवरे ॥'.

जोवर सामान्य ज्ञान प्राप्त होत नाही, तोवर सगुण पूजा जरुर आवश्यक असते. परंतु सम्यग् ज्ञान झाल्यावर सगुण पूजेची जरूरी राहत नाही. निर्गुण-निराकार ब्रम्ह स्वरूपाकडे मग लक्ष्य केंद्रित होते - इथेंच खरी खुरी सायुज्य मुक्तिचा ब्रह्मानंद प्राप्त होतो. आई लहान बाळाला लाडे लाडे खेळवीत असताना कांहीही बडबडते 'माझं वासरू ग, माझं लेकरू ग, माझा श्वास ग, माझा हंडा ग, माझा खजिना गं' वगैरे वगैरे. याला अनुसरूनच कुठंही विचाराने प्रगल्भ न झालेली व्यक्ति सोमवारी शंकराची पूजा, मंगळवारी जगदंबेची पूजा, बुधवारी गणपतीची, गुरुवारी दत्ताची, शुक्रवारी लक्ष्मीची, शनिवारी मारुतिची, रविवारी भैरवाची अशी भरकटत असते. अशा व्यक्तिला ब्रह्मस्वरूपाचा पत्ताही नसतो. व्यर्थ वादाला व भांडणाला प्रोत्साहन. माझा स्वतःचा एक अनुभव सांगतो. कांही वेगळ्या एका संप्रदायी मंडळीनी माझा 'गीत ज्ञानियाचे' (ज्ञानदेवांच्या चरित्राचा) कार्यक्रम ठरविला. मी कार्यक्रम सुरुं केला. तेव्हा इतर श्रवणासाठीं आलेले भक्त दाटीवाटीनें श्रोतृगणांत बसून राहिले, तर संप्रदायी मंडळीनी चक्क पोबारा केला. हे भक्तीचे विडंबनच नव्हे का ? 'गीत गजानन' (शेगावचे सद्‌गुरू श्री गजानन महाराज चरित्र) कार्यक्रम मी सादर करीत होतो एका ठिकाणी' तेव्हा श्री गजानन भक्त गर्दी करून बसले व अन्य संप्रदायी पळाले.

तत्वज्ञानाचे एक थोर अभ्यासक डॉ. बाळकृष्ण यांनी एका ठिकाणी म्हटलेलं आहे- 'डेव्हीफिकेशन ऑफ राम' या संदर्भातील त्यांचंप हे वक्तव्य आहे- 'रामाला देवाचा अवतार मानलं तर ते रामाचं अवमूल्यन ठरतं. मानव असूनही त्यानी अनन्य साधारण त्याग दाखविला, शौर्य गाजविलं असं मानणं योग्य ठरेल. देवाने दाखविले हे गुण असं मानण्यांत काय अर्थ आहे ? देवाला अशक्य तें काय आहे ?' रामभक्तांना ही स्पष्टोक्ती कदाचित रुचणार नाही, पण त्यातील सत्य मानावेच लागेल. भगवद्‌गीतेत म्हटलं आहे- **'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारतं। अभ्युत्तानमधर्मस्य संभवामि युगे युगे ॥ परित्राणाय साधूनाम् विनाशाय्च दुष्कृताम् । धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे** ॥' इथें 'धर्म' याचा अर्थ 'कर्तव्य' असाच घेतला पाहिजे. (रिलिजन असा नव्हे !) समाज कर्तव्य विन्मुख झाला म्हणजेच अवतार होतात-ते मार्गदर्शनासाठी, 'अवतार' हे निर्गुण निराकार ब्रम्हस्वरूपी असतात असं नाही. (नाटकांतला राजा खरा राजा असतो असं नसतं)

संत-सत्पुरुषांचे अवतारही याच कारणासाठी असतात, **'आम्ही वैकुंठवासी । आलो याच कारणासाठीं । बोलिलें जें ऋषी । साच भावे वर्तावया ॥'** असं तुकारामाचं स्पष्ट वक्तव्य आहे. 'दैत्याचि कुळें नाशी । साधुंचा मानु गिवसि । धर्मासि नीतिसि । सेस भरी ॥ हा ब्रम्हस्वरूपी ईश्वराचा हेतू असतो अवतार रुपांत, असं ज्ञानदेवाचा स्पष्ट निष्कर्ष आहे ईश्वरी संदेशाचा.

या सर्व उपापोहाचा एकच अर्थ निघतो- 'जोवर ब्रह्मस्वरूपाची अनुभूति होत नाही, तोंवर 'सगुण' पूजा आवश्यक, अंती 'निर्गुण' भक्ति साध्य झाल्यावर मागे उरते एक 'शून्य'-'ओंकार'. जोंवर अज्ञान आहे. तोंवर मुळाक्षरे-पाढे शिकण्याची गरज असते बाल विद्यार्थ्याला तो पिएच. डी. झाल्यावर मुळाक्षरे पाढे शिकण्याची गरज ती काय ? आपल्या देशांत संतांचे भरपूर अवतार झाले आजही आहेत. त्यांचं विचारधन मिळालं, त्यांच्या उज्वल चरित्रांचा अभ्यास केला व त्यांचीही सगुण दृष्टीने उपासना केली, तर आपण निर्गुण ब्रम्हस्वरूपापर्यंत जाऊन पोहचणं जरूर शक्य आहे. तिथे सर्वभावे 'लीन' झालं की उद्धाराचा मार्ग निश्चित सांपडतो, जीवनांत संसारी मागण्यासाठी त्यांच्याकडे ज्याणे-त्यांना त्या दृष्टीने साकडं घालणं म्हणजे पर्यायाने त्यांचं अवमूल्यन - त्यांचा अवमान-अपमान होय ! ब्रम्हवेत्त्यांचं लक्ष्य त्या निर्गुण स्वरूपाकडेच असतं व भक्तिच्या दृष्टीकोनांतून तेंच इष्ट !

000

# श्री. संतकवयित्री अक्क महादेवी

सु. ह. जोशी

❖❖❖

**कर्नाटक मधील वीरशैव लिंगायत संत अक्क महादेवी ही महान संतकवयित्री होऊन गेली. तिच्या कन्नड मधील भक्ती कविता आपल्या मुक्ताई-जनाबाई-बहिणाबाई आदी महिलासंताच्या भावकवितेसारखी विलक्षण आहे.**

❖❖❖

महान संतकवयित्री अक्क महादेवी यांचा काळ आहे. इ. स. ११६० च्या सुमाराचा. कर्नाटकच्या शिवमोग्ग म्हणजेच शिमोगा जिल्ह्यात त्यांचा जन्म झाला. पिताजींचे नाव विमल नि मातुःश्रींचे नाव सुमती. अक्क महादेवी या सौन्दर्यवती होत्या... त्यांच्या सौंदर्याची कीर्ती तत्कालिन राजा कौशिक याच्या कानापर्यंत गेली... त्याने त्यांना मागणी घातली... इतरांच्या दृष्टीने हा भाग्याचा क्षण होता पण अक्क महादेवींना हे पसंत नव्हते कारण त्यांनी त्या परमशिवाला मनाने कधीच वरले होते. तो शिव हाच त्यांचा पती होता. अक्क महादेवींची दृढ श्रद्धाच होती की 'माझे लग्न भगवान चेन्न मल्लिकार्जुननाशी कधीच लागलेले आहे !

त्या म्हणत माझा परमप्रियकर आहे ना, त्याला रूप नाही तरीही तो अत्यंत रूपवान आहे. त्याला जरा, अन्त काहीही नाही. तो अभय आहे, अकुल आहे, असीम म्हणजे अमर्याद आहे. तोच माझा पती. इतर मरणशील पती नकोतच. त्यांचा विचारच नको. (वचनशास्त्र सार).

पण काय करणार ? आई-वडिलांचा अतिशय आग्रह आणि न जाणो तो दुष्ट राजा आपल्या प्रिय आई-वडिलांनाच छळायचा. म्हणून अक्क महादेवी विवाहाला सिद्ध झाल्या, पण राजाला एक अट घालूनच,

'राजन, आपण माझ्या उपासनेत, पूजेत अडथळा आणता कामा नये... नाहीतर मी वेगळी होईन...'

उतावळ्या राजाने हे मान्य केले पण पाळले मात्र नाही. राजा अशक्त नव्हता तर आसक्त होता. अक्क महादेवींना हे मुळीही सहन होईना. त्यांनी या सगळ्यांचा त्याग केला नि श्रीचेन्न बसवाच्या शोधासाठी त्या बाहेर पडल्या. त्यांनी कुणाचेही म्हणणे मानले नाही. त्या परत फिरल्या नाहीत. स्त्री ही अबला असली तरी तीही सबला होऊ शकते हे त्यांनी आपल्या चरित्राने कर्तृत्वाने सिद्धत्म केले. अध्यात्म साधनेत त्यांची 'वीरवाणी' अलौकिक ठरलेली आहे. त्या म्हणतात,

ज्यांनी डोंगरावर घर बांधलेले आहे, त्यांनी अरण्यातील पशूंना घाबरता कामा नये. समुद्रावर घर करणाऱ्याने लाटांना भिता कामा नये, बाजारात घर बांधले त्याने गोंगाटाला डरून कसे चालेल ? हे चेन्न मल्लिकार्जुना, त्याचप्रमाणे मी या संसारात जन्म घेतलेला आहे तेव्हा मलाही टीका-प्रशंसा या आघातांना न घाबरता शांतीनेच सगळे सोसले पाहिजे.'

अक्क महादेवी संसारत्याग करून कल्याण या तीर्थक्षेत्रात आल्या. कल्याण म्हणजे बसव कल्याण अथवा कल्याणपुरम किंवा कल्याणी. बिदरपासून ५८ किमी. तिथे, भक्ती नि उज्ज्वल चारित्र्य या योगे त्यांनी अनेक शिवशरणांना सन्मार्ग दाखविला (भारतीय संस्कृतिकोश). आपले वीर वैराग्य आणि निर्भय शिवशरणता या बळावर वीरशैव म्हणजे लिंगायत भक्तांच्या मालिकेत अगदी महत्वपूर्ण स्थान मिळविलेले आहे. त्यांची वचने तशी संख्येने अल्प आहेत पण हृदयाला भिडणारी आहेत. तत्त्वार्थ उलगडून दाखविणारी आहेत. योगांगत्रिविधी हा त्यांचा एक छोटासा ग्रंथ. त्यात अतिशय सोप्या भाषेत अध्यात्माचे विवेचन केलेले आहे. जीवनाच्या अंतिम पर्वात त्या बसवकल्याणहून श्री शैलपर्वतावर गेल्या नि तिथेच श्री शैलमल्लिकार्जुनाशी एकरूप झाल्या. (डॉ. हिरण्मय).

अक्क महादेवी ह्या कन्नडकाव्य वनातल्या कोकिळा आहेत. अमर प्रेम हा त्यांचा संदेश आहे. त्यांच्या वचनात सर्वत्र अध्यात्म भरलेले आहे. त्या शिवाशी पूर्णपणे समरस झालेल्या आहेत, असे असूनही त्या शरणार्थिनी राहिलेल्या आहेत.


❑❑❑

# 'ज्योत उजळू दे सत्त्वगुणांची'

– महादेव साने

नाना दुःखे झालीं प्राप्त । तरी खेद ना चित्तांत ॥
आणि सुखाचिया हांवे । माजी गुंते ना स्वभावें ॥
पार्था तयाचिया ठायीं । काम क्रोध सहजे नाहीं ॥
नेणे भयाते केव्हां हि । परिपूर्णपणें राही ॥
भाव बाणला अभेद । ऐसा जो का अमर्याद ॥
ज्याने सोडिली उपाधि । तो चि स्थिरबुद्धि ॥

नाथ संप्रदायातील आजच्या अगदी अलिकडच्या काळांतील थोर संत सत्पुरुष स्वामी स्वरूपानन्द यांनी श्री ज्ञानेश्वरी आणखी सुलभ आणि सोपी करून ती अभंग रुपांत भक्तांसाठी सादर केली. तिच अभंग ज्ञानेश्वरी म्हणून प्रसिद्ध पावली आहे. त्यातील दुसऱ्या अध्यायातील वरील अभंग आहे. ह्या अभंग ज्ञानेश्वरीची भाषा जशी रसाळ आणि मोहक आहे तशीच ती मूळ ज्ञानेश्वरीचेच एक रुप म्हणून प्रगटलेली आहे. त्यामुळे तिच्यातील गोडव्याबरोबरच अर्थवाहकताही तशीच उतरलेली आहे. भगवद् गीतेचे प्राकृतीकरण म्हणून श्री ज्ञानेश्वरी जशी मराठी माणसास परमप्रिय वाटते तसेच श्री ज्ञानेश्वरीची सखोलता सामान्य वाचकांच्या ताकदी बाहेरची बऱ्याच वेळा वाटते. म्हणून तिचेच रुपांतर स्वामी स्वरुपानंदानी अभंग ज्ञानेश्वरीतून अभंग रुपांतून घडविले आहे. आपोआप अभंग रुपामुळे गेयता आली आणि गेयता आली की आपोआप ती स्मरणांत नोंदली. ह्यामुळे अभंग ज्ञानेश्वरी आजच्या काळाला अनुसरुन लोकप्रिय होवू लागली. पण ह्या अभंग ज्ञानेश्वरीत कुठेही मूळ ग्रंथाचा छेद किंवा त्याव्यतिरिक्त भर म्हणून घातलेली नाही. त्यामुळे अभंग ज्ञानेश्वरी वाचताना श्री ज्ञानेश्वर माऊलींची ज्ञानेश्वरी वाचल्याचे समाधान व आनंद लाभतो आणि मनही तृप्त होते.




माणूस दुःखी कां होतो ? आजच्या समाजात वावरताना बोलताना जरा जरी एखाद्याशी जवळीक साधली. जरा परिचय वाढवला जरा स्वतःबरोबर त्याची ही जीवनांतली आपल्या सारखीच कांही सुख दुःखे आहेत काय ह्याचा जरासा कानोसा घेतला जरा जरी त्याच्या दुःखावर फुंकर सहानुभूतीची घातली तरीहि एखादी नुकतीच झालेली जखम जशी भळभळा वाहू लागते तसे तो आपल्या दुःखाचा पाढाच वाचू लागतो, जणू तो असे कुणी सहानुभूतीने विचारायची वाटच पहात असतो जणू. मग तो आपले घर प्रपंच नातेवाईक कार्यालयातला वरिष्ठ अगदी राज्यकर्ते इथपर्यंत आपल्या दुःखाची चढती कमान ऐकवील. ह्यातली बरीचशी दुःखे, अपमान, आजार, अपेक्षाभंग, नशीब, दैव, अपघात ह्यांच्याशी निगडीत असतात. जी शेवटी सारी आपण भोगत असलेल्या अत्यंतिक दुःखाशी निगडीत असतात.

पण आजच्या काळात एकदम एखादा आपली दुःखेच सांगत सुटेल, असा क्वचितच भेटतो. बहुतेकजण कासवाप्रमाणे अंग चोरून शक्यतो हातचं राखूनच बोलत राहतात. पण परिचयाने आणि तो वाढेल तसा एक एक दुःखाचा पैलू आपल्याला जाणवू लागतो. मगतो ही मोकळेपणाने आपल्या दुःखाचा पाढा वाचू लागतो. पण हल्ली समाज बराच संकुचित झालाय. सहसा कोणीही कुणाशी कामाव्यतिरिक्त बोलतच नाही. बोलणेही तुटक आणि त्रोटक असते. सहसा दुसऱ्याला आपले अंतरंग कळू नये हीच भावना असते. पण शेवटी चेहरा बोलका असतो. माझा एक आवडता छंद आहे. वाटल्यास त्याला तुम्ही चमत्कारिकपणा म्हणा हवा तर पण रस्त्यावरुन सहज फिरतानाही येणाऱ्या जाणाऱ्या माणसाचा चेहरा, त्याच्या हालचाली, त्याच्या लकबी यांचा मी अभ्यास करून हा माणूस कसा असेल, त्याच्या स्वभावाची वैशिष्ट्ये काय असतील ह्याचा अभ्यास करतो. पुन्हा केव्हा परिचित झाला तर तो अभ्यास ताडून पाहतो. बहुतेक वेळेला हा स्वभावाचा मी केलेला अभ्यास बरोबर ठरतो. काही अंदाज मात्र साफ कोलमडतात. पण असे चमत्कार क्वचितच घडतात.

विचार केला तर आज कोण सुखी आहे ? समर्थ रामदासांनी

तर तीनशे वर्षांपूर्वीच प्रश्नार्थक स्वरुपांत ह्याचे उत्तर देवून ठेवलेले आहे. ते असे - 'जगी सर्व सुखी असा कोण आहे। विचारी मना तुचि शोधूनि पाहे' ह्यातून स्पष्ट अर्थ बोध होतो. ह्या जगात सर्वार्थान सुखी कोणी हि नाही. प्रत्येकाच्या दुःखाचे स्वरूप अर्थात वेगवेगळे आहे. आणि ते त्याचे दुःख हेच जगातले सर्वात मोठे दुःख आहे असे तो मानतो. आपले केवळ दुःखच कुरवाळीत जन्मभराचा प्रवास करणे हा जणू जीवनाचा नियमच बनलेला असतो. आहे त्यात सुख मानणे हे कधीच शक्य होत नाही. कारण माणसाची विचारशक्ती हा चमत्कार घडविते. पण ह्या विचारांना गती आणि शक्ती देते ते आपले सर्वांचे मन. म्हणूनच म्हणतात की मन चिंती ते वैरी न चिंती. चिता आणि चिंतेतला फरक स्पष्ट करताना म्हणून म्हटले आहे. चिता एकदाच जाळून भस्म करते तर चिंता जीवनभर मरणप्राय यातना जिवंतपणी देते.



आता ह्या काळज्या चिंता, दुःखे यांचा विचार करु. ह्या जीवनांतील बहुतेक सारी दुःखे माणसाने माणसासाठीच निर्माण केलेली आहेत. ह्याला कारण माणसाचा स्वतःकडे जगाकडे आणि एकुणच जीवनाकडे पाहण्याचा विवेकशून्य दृष्टिकोन हाच आहे. आत्यंतिक सुखाचा आपल्याला क्वचितच वीट येतो. तर थोड्याशा दुःखाने आपण व्याकुळ होतो. ह्या साऱ्या दुःखांचा विचार केला तर आपला अहंभाव हेच त्याला मूळ कारण आहे. काम, क्रोध, मद, मोह, दंभ आणि मत्सर हे सहा शत्रू वास्तविक आपणच निर्माण करतो. आणि ते एखाद्या राक्षसासारखे आपल्या मानगुटीवर जीवनभर बसतात. संत तर म्हणतात दैहिक सुखाच्या लालसेचा अतिरेक हाच ह्या आपल्या साऱ्या दुःखाचे उगमस्थान आहे. ह्या उलट आत्मिक किंवा अधिभौतिक सुख हे कष्टसाध्य आहे. पण दैहिक सुख हे क्षणाचे सुख ठरते तर अनंत काळचे दुःख ठरते. तर आत्मिक सुख हे जीवनभराचे सुख ठरते. मग आपण ह्या दैहिक सुखाच्या पाठी कां लागतो. तर त्याला कारण आपल्या मनाच्या प्रवृत्ती ह्या त्रिगुण स्वरुपांत अध्यात्मात वर्णिल्या आहेत. सत्व, रज आणि तम. आणि ह्या गुणांनुसार युगकल्पना निर्माण झाल्या. आज तमोयुगाचा काळ म्हणजे कलियुग आहे. हा कलि म्हणजेच तमोगुण मनाला स्वस्थ बसू देत नाही. मनाची चंचलता आपल्या विचारशक्तीवर परिणाम करते. ज्यातून क्षणिक सुखाला बळी पडून माणूस अविचारी बनतो आणि आयुष्यभर सुखाच्या शोधात आणि दुःखाचे गाठोडे पाठीसुद्धा नाही तर मनांत घर फिरत राहतो. अगदी अखेरच्या घटकेपर्यंत तो मनातला राम न पाहता रावणचिंतन करत राहतो. ही गत तुमची-आमची सर्वांचीच आहे. आपण दुःखाची बाभूळ उगाळून सुखाच्या चंदन गंधाची अपेक्षा करतो. तो गंध कसा लाभावा.

तुकाराम आदि संतांनी तर स्पष्टच म्हटले आहे. सुख पाहता जवापाडे दुःख पर्वतायेवढे. पण हे संत आणि आपण ह्यांत मात्र जमीन अस्मानाचा फरक असतो. अभंग ज्ञानेश्वरीच्या ओवीतील स्थिर बुद्धीच्या माणसाचा दाखला जो सुरुवातीला दिला आहे तो संत संज्ञन आणि साधुपुरुषांत प्रकर्षाने जाणवतो. संत कधी दुःखाने व्याकुळ होत नाहीत किंवा क्षणिक सुखाने हुरळून जात नाहीत. संत आणि सामान्य ह्यातील फरक वरील अंभंगातून स्पष्ट करताना स्वामी स्वरूपानन्द म्हणतात. अनेक प्रकारची देहाची, मनाची, प्रपंचाची दुःखे सतत डोंगराप्रमाणे कोसळत राहिली किंवा सागरलाटेप्रमाणे झोडपत राहिली तरी तो अचल आणि अढळ राहतो. तसेच सुख सुख म्हणून अधाशी माणसागत सुखाच्या पाठी पळत सुटत नाही. आपोआपच अर्जुना अशा त्याला काम क्रोधाची बाधा स्पर्शू शकत नाही. दुःख आणि सुख ह्याकडे पाहण्याची त्याची समबुद्धी असल्याने आपोआपच तो भयमुक्त असतो. ज्याची बद्धी भेदापार झाली त्याला सर्वांठायी ईश्वराचा अंश जाणवतो. त्यामुळे तो अद्वैताचा उपासक बनलो. परिणामी त्याचा अहंभाव नष्ट झाल्यामुळे असाच पुरुष स्थिर बुद्धि होवू शकतो. ही स्थिर बुद्धी होणे ही कांही क्षणांचा बाब नाही. त्यासाठी तपःश्चर्याही हवी.

निदान आम्ही सामान्यजन आमचे सारे गुणदोष ईश्वरार्पण करु शकतो. ज्यातून आम्ही दैहिक सुखालाच जीवनांतील सर्व सुखाचे निधान मानणार नाही. आपोआपच आमचा अहंभाव आणि दंभ कमी होईल. मनांतला रामरुपी सत्वगुण थोडा तर जागा होईल व तो एकदा मनांत स्थिर झाला की मनांतल्या रावण प्रवृत्तीरुपी तमो गुणांचा निचरा होवून ते शांत आणि स्थिर होईल. आणि जीवनांत सद्चिदानंदरुपी प्रकाश उजळून खरे सुख हे परमार्थात आहे आणि दुःख हे स्वार्थात आहे हे पटले की खऱ्या अर्थाने मनामनांतील दिवाळीची दीपज्योत उजळेल. संतांची सामान्यांकडून एवढीच अपेक्षा आहे.



# साईवंदना



## धाव घेई साईनाथा

(अभंग)

तव भक्ताचा धावा ऐकूनी
धाव घेई साईनाथा
भक्त वत्सला दिनदयाळा
सांभाळी मज आता ॥धृ॥

देहाचाही लोळागोळा
करुनी टाका चोळामोळा
जगण्याचा रे कंटाळा
धावे मजला मरणही आता ॥१॥

दैवचक्रही उलटे फिरते
नैराशाचे वादळ उठते
आशा माझी भंग पावते
मुक्त करावे नकोच चिंता ॥२॥

गुरु माऊली धावत यावे
घरी आपुल्या उचलुनी न्यावे
शरणांगदा सांभाळावे
एक प्रार्थना साईनाथा ॥३॥

■ योगेश्वर अभ्यंकर
नाशिक

## ॥साईनाथ॥

परमेश साई । ब्रह्म अनंत,
कृपादयावंत । मोक्षदाई ॥१॥

सर्व धर्मांचे ते । तेजरुपसार
ओज चराचर । चैतन्य ते ॥२॥

साई माझी मुक्ती । शक्ती, भक्ती, प्रीती,
चैतन्य विश्रांती । आत्मरुप ॥३॥

साईनाथ थोर । विश्वाचा पालक
ब्रह्मांड मालक । सगुणरुप ॥४॥

साईनाथ करी । भक्तांचे पालन
जीवांचे शरण । तोचि एक ॥५॥

इथे तिथे साई । भरुनी उरला
धरितो हाताला । सांगाती हा ॥६॥

■ गो. स चरणकर,

## 'संतश्रेष्ठ साईबाबा'

शिरडी साईबाबा पुण्यवान संत
भक्त जेणे जोडियले श्रद्धाळू
अनंत लाभला आम्हा
संत सद्गुरु कृपावंत
जया सेवेला नाही आदि आणि अंत

महाराष्ट्र देशी शिरडी तीर्थक्षेत्र
तिथे नांदती श्री साईबाबा सुपात्र
चिंता, भीतीमुक्त तेथेची जाहली
साईबाबांची वाचा सार्थकी झाली.

दुरितांच्या कल्याणा देह झिजविला.
भक्तांच्या रक्षणा धावुनिया गेला.
अनंतकोटि परब्रह्म असा संतश्रेष्ठ
रंजल्या गांजल्यांचे दूर करी अरिष्ट

■ सौ. प्रमिला मधुकर वखारे
बदलापूर, ठाणे

## सद्गुरु साईनाथा

श्री शिर्डी साईबाबा
गुरूमाय बंधु पिता ज्ञान सिंधू
तोच पदी नम्रभावेची वंदू
नसे कोणी संसारी आम्हासी त्राता
नमस्कार शिर्डीच्या सद्गुरू साईनाथा ॥१॥

मुंडाशे तो भरजरीचा
तो कोठ काठी हा डौल सांचा
विभूतीस लावी हरी सर्व चिंता
नमस्कार शिर्डीच्या सद्गुरू साईनाथा ॥२॥

दिले द्रव्य दारा गृहा वैभवासी
दिले पुत्र आरोग्य भूमी कोणासी
शरणव्रताचा भय शोक हर्ता
नमस्कार शिर्डीच्या सद्गुरू साईनाथा ॥३॥

जरी अष्टासिद्धी वंश होता ज्यासी
नाही कधी मानीत हा तयासी
जो दुःखहर्ता जनी सौख्यदाता
नमस्कार शिर्डीच्या सद्गुरू साईनाथा ॥४॥

विभूती मिळे जो पदी नम्र त्यासी
श्रद्धा नसे त्यास हलकोनी हेसी
नाही भीती भीड तैंसी अहंता
नमस्कार शिर्डीच्या सद्‌गुरू साईनाथा ॥५॥

कदा गुरूवारी चुकली ना वारी
श्री साईनाथा पदी नम्र स्वारी
असे साई साक्षात सन्मार्गदाता
नमस्कार शिर्डीच्या सद्‌गुरू साईनाथा ॥६॥

साधुनी गुरूवार तो घे समाधी
की लागली देहमाया उपाधी
गुरूस्थानी राहे गुरूपायी आता
नमस्कार शिर्डीच्या सद्‌गुरू साईनाथा ॥७॥

जरी देह गेला तरी शक्ती आहे
कृपादृष्टीने सर्व भक्ताशी पाहे
श्री शिर्डी साईनाथाचे पदी नम्र माथा
नमस्कार शिर्डीच्या सद्‌गुरू साईनाथा ॥८॥

■ **धोंडीराम डवरी**
बहिरेवाडी, ता. पन्हाळा,
कोल्हापूर.

# मला वाटते रे साई...

मला वाटते रे साई
पुष्प सुंदर मी व्हावे ।
गंध, मार्दव, सौंदर्य
तव चरणी वहावे ॥

मला वाटते रे साई
दीप स्नेहाळ मी व्हावे
कण कण प्रकाशून
मंदिर हे उजळावे ॥

मला वाटते रे साई
खोड चंदनाचे व्हावे ।
श्रद्धा, भाव, भक्तिसाठी
आमरण मी झिजावे ॥

मला वाटते रे साई
तव सन्निध रहावे ।
देहभान विसरून
साईरुपीं मग्न व्हावे ॥

■ **संहितेश्वरी कुलकर्णी**
नारायण नगर, होंडा गोवा.

# शिरडीच्या वाटे...

शिरडीच्या वाटे, भक्ताची हो दाटी
सगळ्यांच्या ओठी, साईनाम ।

टाळ मृदंगाचा, गोड तो आवाज
सगळ्याचा साज, मधुर तो ।

भक्त गण सारे, रंजले कीर्तनी
कोणी तो भजनी, माऊलीच्या ।

वाचे गुण गाती, लाडक्या साईचे
देहभान सारे विसरूनी ।

पतीत पावन शिरडीरायाचे
वेड दर्शनाचे, सर्वापरी ।

घेवूनी दर्शन, लाडक्या साईचे
धन्य होती सारे, भक्त गण ।

■ **एम. के. गुम्मलवार**
नांदेड

# तुझ्या भजनात दंग

तुझ्या भजनात दंग
मन झाले रे अभंग
घुमे देहातून धून
जसा डोहात तरंग ॥

घडे तुझी माझी भेट
आता तेवढीच वाट
भिडे काळजाला थेट
आता तेवढाच संग ॥१॥

तुझ्या गजरामधून
गेल्या वासना धुवून
आता स्फटिकासमान
माझा कोणता रे रंग ॥२॥

माझ्या जीवनाची नाव
आता पैलतीरी लाव
औट घटकेचा डाव
केव्हा मिटायचा सांग ॥३॥

■ **प्रसाद कुलकर्णी**

# सद्‌गुरु भक्ती

– कृष्णा तेली

❖❖❖

**हेमाडपंत लिखित 'साईसत्य--' पोथी, साईभक्तांचे एक अढळ श्रद्धास्थान - आधारस्थान आहे. या गोष्टीचे पारायण साईभक्त मोठ्या भक्तीभावाने करीत असतो. श्री कृष्णा तेली यांना साईस-- पोथीच्या पहिल्या ५ अध्यायात साई सद्‌गुरुंचे झालेले दर्शन ते या लेखाद्वारे आपणास घडवित आहेत.**

❖❖❖

श्री साई सच्चरित्र ही भक्तीरसाची अखंड सरिता आहे. साईभक्ताना ती तर आपली जननीच वाटते. श्री साईनी ती आपल्या प्रिय भक्तांना आपल्या प्रेमपाशात सदैव दृढ भक्तीची कास धरण्यासाठी केलेली अलौकीक किमया आहे. साई स्वतःच ॐकार वीणा हाती घेऊन भक्तोद्धारासाठी निजरुपाचे चरित्र सांगत आहेत. ही भवनदी पार करण्यास एक सद्‌गुरू श्री साई समर्थ आहेत तेच आमचा हा दुस्तर प्रपंच पार करण्यास सामर्थ्य देतील. त्यासाठी फक्त श्री साईचे ध्यान करून त्यांचे गुण सतत श्रवण केले मात्र पाहिजे. सर्वकाळ श्री साईचिंतनात मन गुंग झाले तरच हे संसारबंधन तुटेल.

या साई रुपी सद्‌गुरूंचे अखंड नाम आमच्या ओठी असावे, त्यांचा सहवास आम्हाला प्रिय वाटावा, त्याचे चरणामृत, त्यांचा गुरुमंत्र हा आम्हाला प्राप्त हो३ो. अशी मनापासून आमची तीव्र इच्छा आहे. गुरु-संगती रुपी गंगाजळ मन स्वच्छ करून निर्मळ बनविते. या चंचल मनाला हरीचरणी ते थारा देऊन --- बहाल करतात ते माझे सद्‌गुण वेदशास्त्ररुप थोर आहेत. साईसमर्थ' हा एकच मंत्र आम्हा सज्जनानां तारून नेईल अशी निश्चितपणे खात्री आहे. जग हे नशवर आहे याची पूर्ण जागृती आम्हा भक्ताना आहे यात तिळमात्र शंका नाही. आपल्या भक्ताना सदैव 'आनंद वृत्ती' प्रदान करणारे सद्‌गुरू श्री साईनाथ हे आम्हाला प्राणाहून प्रिय झाले आहेत. सदासर्वदा सुखशांती बहाल करून आमची चित्तवृत्ती पूर्ण समाधानी ठेवणारे श्री साई स्वतः आनंदवृत्तीचे उद्‌गाते आहेत म्हणून तेथे कदापीही दुःख नाही. तेथे फक्त परमानंदाचा आस्वादच घेण्यास आम्ही भक्तमंडळी तयार असतो.

साईचे स्वरुपही आम्ही जाणून आहोत ते तर त्रिगुणापलिकडे स्थित आहेत. फक्त आम्हा भक्तांच्या प्रेमासाठी ते सगुणात दर्शन देतात ही त्यांची लीला असल्यामुळेच आम्ही त्यांना अनन्य शरण गेलो आहोत. श्री साईच्या शुद्ध स्वरुपापलिकडे या जगात दु रे जप, तप. आम्ह ला ठाऊकच नाह .

श्री साईचे असे हे 'सगुण' आणि 'निर्गुण' स्वरूप आकलन होताच आम्ही आमचे म्हणून दुसरे कांही पाहातच नाही. या साईप्रेमाच्या रसात तुडुंब भरुन निघाल्यावर मग वेगळे शास्त्रपुराण वाचावेसे वाटत नाही. तीर्थयात्रा नकोशी वाटते, जप-तप हे सर्व वरपांगी उपचार ठरतात. सद्‌गुरुनी आपल्या चरित्रात जे भक्ताना उपदेशामृत पाजले आहे त्य मुळे चित्तवृत्ती स्थिर बनून जाते. सदत्तगुरुप्रती अढळ श्रद्धा प्राप्त होऊन सगुणातून निर्गुणाकडे झेपावत जाते. हेच भक्तीचे लक्षण पुढे 'स्वस्वरुपानुसंधान' बनते. सद्‌गुरुकृपेने जे काम वाट्यास येते ते पार पाडणे एवढेच कर्तव्य आपल्या हाती राहते त्याचे फळ कोणते तीही आता मावळते कारण 'मी' असा कोणी 'कर्ता' वा 'भोक्ता' शिल्लकच राहत नाही. फलाशा संपूर्ण नष्ट झाल्यामुळे मनाला पूर्ण -- मिळून श्रीसाई कृपेनेच मला माझे नित्यकर्म करावे लागते एवढेच भान राहते आणि संतानी त्यालाच 'स्वधर्म' म्हणून संबोधले आहे.

खरे पाहीले तर आम्ही भक्ती करणारे कोण ?

केवळ संतांच्या स्फूर्तीनेच आम्हांकडून त्यांची सेवा करून घेण्याची प्रेरणा मिळते. हा अहंकार आणि 'मी' एकदा आम्ही सद्‌गुरु चरणावर अर्पित केल्यावर या संसारात सुखाने विहार करण्याचेच भाग्य संत प्रदान करतात. अहंवृत्ती जीरली की सद्‌गुरु आपले अढळपद भक्तांना बहाल करतात असे हा रोकडा अनुभव तर घेऊन पहा !

'अहंम टाकून माझ्या पदी निमाला त्याला क्षणोक्षणी मी साह्यार्थ त्याच्याजवळच उभा आहे' असे स्पष्ट आश्वासन श्री साईनी आम्हाला दिले आहे. इतर कोणत्याही साधनाने मी भक्तांच्या जवळ येणार नाही मी अप्राप्त राहीन, परंतु श्रद्धेने जे माझी आराधना करतील तेथे मी आहेच यात माझ्या भक्तानी तिळमात्र मनात शंक ठेऊ नये असे सद्‌गुरु माऊली पुनःपुनः आम्हास सांगत आहेत. आपला उद्धार आपणच केला पाहीजे या --वचनाचा आधार घेऊन ते भक्ताना वादावादी पासून दूर राहण्याचे मार्गदर्शन करीत आहेत. वादावादीत सापडलेला भक्त

एक क्षण ही मला प्राप्त करु शकत नाही तो 'अनन्य' होणे हेच साधनेचे सार आहे हे लक्षात ठेवावे. ''नित्य निराभीमानाने जे माझी प्रार्थना करतील ते माझे भक्त काय टाळावे व काय आत्मसात करावे याचा स्पष्ट संकेत देताना श्री सद्‌गुरु आम्हा भक्ताना 'अहमहमिका' वादासाठी' टाकून अनत्र्य होण्यास शिकवीतात. यासाठी 'श्रद्धा आणी सबूरी' ही दोनच हत्यारे सर्व विकल्पना पुरेशी आहेत परमार्थाचा खरोखर वाटेकरी व्हावे असे ज्या भक्तांना वाटत असेल त्यांनी श्री साईचा हा अमोल अमृतकण हृदयात जपून ठेवावा व आयुष्याची उर्वरीत वाटचाल करावी.



श्री साईनाथ आम्हा भक्ताना प्रपंचातून परमार्थाकडे वाटचाल करण्यासाठी एकच कानमंत्र दिला आहे आणि तो म्हणजे भक्तीभावाने साईलिलेचे श्रवण-मनन-निदीध्यास करणे, बाकी सर्व श्री साई पाहतील ! सद्‌गुरुंचे चरित्र वाचताना अविद्या पार पळून जाते. प्रपंचाचे भान मावळून जाते.

विश्वासयुक्त 'सद्‌गुरुचिंतन' घडून जो त्यांना अनन्य शरण गेला त्याला उद्धारण्याचे कार्य श्री गुरुच करतात. काळाच्याही दाढेंतून भक्ताला ओढून काढण्याचे सामर्थ्य ते स्थापीत करू शकतात. ''माझी कथा श्रवण करावी त्यावर पूर्ण मनन करावे व त्या कथेचा ध्यास वारंवार हृदयात जागृत ठेवावा त्यायोगे तुम्ही पूर्ण समाधानी बनाल !'' असे श्री साई आपल्या भक्ताना आवर्जुन सांगत आहेत. त्यायोगे 'मी' 'तू' पणाची सर्व व्याधी दूर जाईल व द्वंद्व पूर्णपणे शमेल. ऋणाबंधाशिवाय आपल्या आसपास कुणी उगाच येत नाही त्या साठी कुणाही प्राणीमात्रा विषयी मनात तिरस्कार ठेऊ नये त्याना हड्‌हड् करु नये. सद्‌गुरुपाशी वृत्ती स्थिर ठेऊन पहावी... हेच भक्तीचे खरे वर्म अशी शुद्ध स्थिती अंगी बाणली की प्राप्ती घडते. सद्‌गुरु कोण, त्याचे स्वरुप कोणते हे मनापासून समजून घ्यावे व मग त्यांची यथार्थपणे सेवा करावी-पूजा करावी म्हणजे त्यांच्याशी हळू हळू अनन्यता-तद्रुपता प्राप्त होईल. सद्‌गुरुशी समरसून गेलेला भक्त कोणत्याही दृष्य जगाच्या पलिकडे स्थिर व अढळ राहातो. भक्त कोठेही असो तो काही करत असेल तर त्या सर्व भक्तांच्या कृती वर सदैव सद्‌गुरुचे लक्ष असते. प्रत्येक प्राणामात्रात तेच भरले आहेत. सकळ चराचरात तेच सद्‌गुरु भरून उरले आहेत.

स्वतः श्रीकृष्ण म्हणूनच सांदीपनीकडे सद्‌गुरुसेवार्थ राहीले.

गुरुभजनाची ज्याला आवड नाही तो अभागी समजावा. तो आपला खरा 'स्वार्थ' ओळखत नाही व अंती तो जन्ममरण या तडाख्यात अडकतो. म्हणून भक्तानी याचा वेळीच विचार करावा वेळ वाया घालवू नये-फक्त व्रतेउद्यापने - उपवास किंवा शरीराला मनाला (यातना) देऊन देवप्राप्ली होणार नाही. याचा पूर्ण विचार करावा व काम करावे. तीर्थ यात्रा करून पुण्य पदरी पडेल पण शेवटचा टप्पा गाठता येणार नाही त्यासाठी सद्‌गुरुनी 'श्रवण' हा उत्तम व सोपा मार्ग भक्ताना बहाल केला आहे याचा पुरेपुर फायदा उठवावा.

भक्तीचे खरे वर्म सांगताना सद्‌गुरुनी आपणास, अकृत्रिम प्रेम करावे म्हणजे अविद्या नष्ट होऊन परमार्थ सहजच हाती लागेल असे निश्चयाने सांगितले हेच भक्तीचे वर्म !

सद्‌गुरुंचे चरणतीर्थसेवन हेच आमचे वासना निर्मूलनाचे शस्त्र ! खरा देव दृढ श्रद्धेने भजावा. जगाची चिंता करीत उगाच बसू नये. श्री साईचे पाय अथवा चरण युगुल सोडून तुम्ही सैरावैरा का धावता ? तेच समचरण तुम्हाला या भवसागरातून तारतील ही खात्री बाळगा ! गुरवारी व शुक्रवारी नित्यनैमाने आपल्या ईष्ट देवतेसमोर किंवा सद्‌गुरुंच्या स्थानाशी उद कींवा धूप/कापूर जाळावा. अशा भक्ताना श्री हरी सुखप्राप्ती देतो.

श्री साईची थोरवी आम्ही पामरानी काय ती गावी ? अक्कलकोट स्वामींचे सत्‌शिण्य आनंदनाथांनी श्री साईना प्रथमदर्शनीच पहाता ''हिरा हो प्रत्यक्ष हा हिरा''। असे भावनापूर्ण उद्‌गार काढले.

परब्रम्ही एकरुप झालेल्या श्री साईना तेलाशिवाय पणत्या पेटवीणे हा सहज खेळ वाटला कारण --- सर्व शक्ती त्यांच्या समोर हात जोडून सेवेसाठी हजर असतात. संताना शरण जाण्यासाठी स्वतःची हुशारी कामास येत नाही व्यवहारातील चतुराई तेथे काम करीत नाही म्हणून अभिमानरहित अवस्था प्राप्त करणे हेच स्वहीत साधणाऱ्यानी पूर्ण लक्षात घ्यावे.

देहाचाअभिमान त्यागावा हे जो करील त्यानेच हा देह सार्थकी लावावा असे श्री साईचे भक्ताप्रती सांगणे आहे.

म्हणून परमार्थाचा वाटेकरी होणाऱ्या भक्तानी स्वहीत जपावे 'अंह' त्यागावा व 'अनन्य' होण्यास शिकावे म्हणजे श्री साईनाथ त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण करतील यात शंका बाळगू नये.

०००

# साई अनुभव



## जाको राखे साई

माझ्या जीवनात परम कृपाळु बाबांच्या कृपेचा आलेला संस्मरणीय अनुभव साईभक्ताच्या माहितीसाठी निवेदन करीत आहे.

वर्ष १९८९ चा डिसेंबर महिना तारीख २८ होती. मी व माझी पत्नी दोघेही ऑफिसात गेलो होतो. माझी क्रमांक तीनची मुलगी चि. सुहास पण ऑफिसात गेली होती. आम्ही पती पत्नी संध्याकाळी ५ वाजता ऑफिसातून घरी परतलो तो दाराशी दोन अनोळखी व्यक्तीना पाहून मन चरकले. घरी दोन आणखी धाकट्या मुली होत्या. त्या दोन्हीही व्यक्ती आमच्या सुहासच्या ऑफिसातल्या होत्या. त्यांनी सांगितले की, चि. सुहास ऑफिसच्या इमारतीच्या ३ऱ्या मजल्यावरुन, जिथे तिचे ऑफिस होते, जवळ जवळ ५० फूट उंचीवरुन पडली. आणि तिला हॉस्पिटलमध्ये पोहचवले आहे. व तुम्हां दोघास नेण्यासाठी आम्ही आलो आहोत. बातमी ऐकून डोकं सुन्न झाले. परिस्थितीची काहीच कल्पना येईना. मुलगी जिवंत आहे किंवा नाही? आम्ही दोघंही नखशिखांत हादरुन गेलो. तशाही परिस्थितीत घरात धावत जाऊन देवापुढची बाबांच्या उदीची डबी खिशात टाकली व बाबांवर सगळा भार टाकून त्या व्यक्तींबरोबर हॉस्पिटलमध्ये पोहोचलो. चि. सुहासला प्राथमिक तपासणी करुन वॉर्डमध्ये नेलं होतं. तेथे जाऊन पाहतो तो एका पोलिस निरीक्षक तिचे स्टेटमेंट घेत होता. तिला बोलताना पाहून जिवात जीव आला. ताबडतोब बाबांची उदी तिच्या कपाळाला लावली. त्याबरोबर ती मला म्हणाली, पपा ! मला बाबांनीच वाचविले. ऑफिसमध्ये मी ज्या जागी पडली ना, ती जागा म्हणजे तीन मजली इमारतीच्या पिछवाडीची एक ६ फूट रुंदीची अत्यंत अरुंद अशी बोळ होती. तेथे फुटक्या काचेच्या बाटल्या, मोठमोठाले दगडे बोटाडर आणि लोखंडाचे खांब पडलेले. या सगळ्या कचऱ्यात एक ३x४'खड्डा होता. त्याच्यात चिखल व पाणी होते. त्यात झाडाच्या फांद्या आणि पाचोळा गोळा होता. चि. सुहास नेमकी या खड्यात पडली जशी तिला कोणी अलगद उचलून तेथे ठेवले असावे. मुलीला फक्त स्पायनल कॉर्डमध्ये लेबर २ आणि ५ मध्ये कॉम्प्रेशन आले होते. याव्यतिरिक्त पायाच्या नखापासून डोक्यापर्यंत शरीरावर एक छोटासा ओरखडादेखील नव्हता. पाठीच्या कण्यामध्ये आलेलं कॉम्प्रेशन तीन महिन्यात फिजिओ थेरपीने ने बरे झाले. आता तिचं लग्न होऊन ५ वर्षाचा एक गोड मुलगापण आहे.

खरोखर त्या दिवशी साईबाबांनीच तिला वाचविले.

खरंच, जाको राखे साई, मार सके ना कोई याचं प्रत्यंतर आलं. आणि मन साईश्रद्धेनं भरुन झालं.

माझ्या आयुष्यात अत्यंत अडचणीच्या वेळी बाबांनीच मला निभावून नेल आहे. आणि पुढेही नेतील.


**– जे.एस.लक्कड**
डि-९१, गौतम नगर,
भोपाळ, म.प्र.

## श्रध्देची किमया

साईबाबा! म्हणजे साक्षात भूतलावर अवतरलेले परमेश्वर . त्यांनी अनेक चमत्कार घडवून आणले. मलासुद्धा त्यांचे कित्येक अनुभव आलेले आहेत. त्यातला एक प्रसंग मी थोडक्यात देत आहे.

१९९६-९७ मी एस. एस.सी.ला होते. माझा गणित विषय अतिशय कच्चा आहे. साईचं नाव घेतच मी सारे विषय सोडविले . मला गणिताचा पेपर तसा अवघडच गेला होता. मात्र साईनी माझा धीर खचू दिला नाही. सुट्टीत मी 'साईलीला'चे सतत वाचन करीत असे, व साईंना विनवीत असे की, ''देवा ! मला गणितामध्ये चांगले मार्क पडू देत.''

अखेर रिझल्टचा दिवस उजाडला. माझे तर हात-पायच गळून गेल्यासारखे झाले. मी भीतभीतच रिझल्टचे पॅकेट फोडले. तर काय जणू आश्चर्यच ! मला गणिता मध्ये चांगले मार्क मिळून प्रथम श्रेणी मिळाली होती. मी तर साईंच्या शंभरवेळा पाया पडले. अशी ही साईंची अजब लीला. वर्णावी तिकी कमीच.

**– रेखा गवस**
कुडाची, बेळगाव.

## साई तारी त्याला कोण मारी

माझे जो गाई चरित्र पोवाडे। तयाचे मी सदैव मागेपुढे, असे साईबाबांनी म्हटले आहे. हे अगदी सत्य आहे. दि. ७.९.९७ रोजी माझे पती शेतात गेले असता त्यांच्या पायाला सर्पदंश झाला. शेताजवळ रोड असल्यामुळे एक सुझुकी गाडी आली. त्या गाडीवरून एक दांपत्य चालले होते. त्यांनी लगेच माझ्या पतींना ७-८ कि.मी. वर असलेल्या वैराग येथे नेले. व भूमकर हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मला घरी ३ वाजता निरोप पोहचला, सर्पदंश झाला हे ऐकून मी खूप घाबरले. मला कांहीच सुचेना. मी बाबांच्या तस्वीरीला नमस्कार केला. व म्हटले तुम्हीच माझ्या सौभाग्याचे रक्षण करा. माझ्या पतीला काहीही होऊ नये. मी 'साईलीला' मासिकात लेख देईन. मी उदी घेवून ताबडतोब गाडीवर वैरागला गेले. तेथे माझ्या पतींना सलाइन लावलेले होते. हे खूप घाबरलेले होते. चक्कर येतेय असं म्हणत होते. लघवीला म्हणून बाहेर आणताच ते बेशुद्ध होऊ लागले. हात, पाय, मान वैगरे लुज पडले. मी व माझे दीर खूप घाबरलो. आंम्हाला रडू आवरेना. लगेच आंम्ही जीपने बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलो. मनांत सारखा बाबांचा धावा करत होते. तेथे उपचार चालू असताना पायाला बरीच सूज आली होती. मी त्यांना पाण्यात उदी देत होते व पायालापण चोळत होते. तिसऱ्या दिवशी आंम्हाला घरी पाठविले. पायाला सध्याही थोडीशी सूज आहे. बाबांच्या कृपेने तिही नष्ट होईल. माझ्या पतीचा पुनर्जन्म झाला. बाबांच्या कृपेनेच आमच्यावरील संकट टळले. ''माझा जो जाहला कायावाचा मनी। तयाचा मी ऋणी सर्वकाळ'' हे बाबांचे वचन सत्य आहे. आमच्या घरातील सर्वच साईभक्त आहेत. आतापर्यंत अनेक संकटातून व अडचणीतून बाबांनी आम्हाला सोडविले. बाबांच्याच आशिर्वादाने आम्ही सुखरुप आहोत. बाबा आमच्या पाठीशी सदैव राहोत एवढीच इच्छा. बाबांच आमचे सर्वस्व आहेत. त्यांच्या चरणी माझे कोटी कोटी प्रणाम. बाबांनी सर्वांना सुखी ठेवावे. त्याबरोबरच आमच्या कुटुंबालाही सुखी ठेवावे. मला अखंड सौभाग्य लाभावे हीच विनंती. जय परब्रह्म, राजाधिराज सच्चिदानंद श्रीसाईनाथ महाराज की जय.

**– सौ. सुमन सौदागर**
काशीद मु. पो. पिंपरी (साकत).

## जया मनी जैसा भाव

अनंत कोटी ब्रह्मांड नायक राजाधिराज योगीराज परब्रह्म श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज कीजय.''

**''नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य ॥**
**नित्य ह्या प्रचित अनुभवे ।.**

**''जो जो मज भजे जैशा जैशा भावे ॥**
**तैसा तैसा पावे मी ही त्यासी॥''** .

वरील बाबांच्या वचनाचे आम्हाला अनेक अनुभव आले आहेत. व अजूनही येत आहेत. त्यापैकी दोन अनुभव खालीलप्रमाणे आहेत.

कित्येक दिवस शिर्डीला जायचं व बाबांचं दर्शन घ्यायचं ही मनातली इच्छा होती. पण परमेश्वराच्या इच्छेशिवाय काहीच घडत नाही. हेच खरे.

शेवटी शिर्डीला जायचा तो दिवस उजाडला. ३ जून १९९६ रोजी सकाळी ८ वाजता. माझं व माझ्या पत्नीचं शिर्डीला जायचं नक्की ठरलं. माझी मुलंसुद्धा शिर्डीला जाण्यासाठी मागे लागली. मी लगेच जाऊन ५ तारखेचं दुपारी १२.३० च्या गाडीचे रिझर्व्हेशन काढलं.

बुधवारी ५ तारखेला आम्ही १२.३० गाडीमध्ये बसलो. मी, माझी पत्नी व तीन मुले. रात्री ९ वाजता आम्ही शिर्डीला पोहचलो. प्रथमच शिर्डीला गेलो त्यामुळे काही माहिति नव्हती.

प्रथम राहण्यासाठी संस्थानच्या इमारतीमध्ये चौकशी केली. परंतु सुट्टीचे दिवस असल्याने सर्व खोल्या बुक झाल्या होत्या. नंतर शिर्डीपासुन एक किलोमीटर दूर असलेल्या संस्थानच्याच इमारतीमध्ये गेलो. तेथेसुद्धा सर्व खोल्या बुक झाल्या होत्या. मी नाराज झालो कारण माझ्यासोबत पत्नी व तीन मुले होती. नंतर मी हॉलमध्ये जागा घेतली. तेथे आम्ही जेवण केलं व पत्नी व मुलांना आराम करायला सांगून मी काऊंटरवर आलो. परत तेथे खोलीची चौकशी केली. साईबाबांच्या कृपेने मला ताबडतोब खोली मिळाली.

नंतर दुसऱ्या दिवशी, म्हणजेच गुरुवारी सकाळी ४ वाजता बाबांच्या दर्शनासाठी रांग लावली. १० वाजेपर्यंत आम्हाला बाबांचे दर्शन मिळाले. बाबांचं दर्शन घेतल्यानंतर गुरुस्थानाचं दर्शन घेण्यासाठी आम्ही रांग लावली. प्रथमच शिर्डीला गेल्याकारणाने गुरुस्थानाजवळ धूप जाळायचे आम्हाला माहीत नव्हते ? म्हणून धूप काही आम्ही घेतले नाही. ''तेवढ्यात एक लहान मुलगा एक धूपाची पुडी घेऊन आला'' व माझ्याकडे एक रुपया मागितला व ती पुडी देऊन निघून गेला. तो परत दिसलाच नाही.

दोन दिवस आम्ही शिर्डीला राहिलो. द्वारकामाई, लेंडीबाग, चावडी व खंडोबाचे देऊळ येथे जाऊन दर्शन घेतले. व शुक्रवारी दुपारी १.३० च्या गाडीने आमचा परतीचा प्रवास सुरु झाला. रात्री १० वाजता आम्ही श्री साईसमर्थाच्या आशिर्वादाने सुखरुप घरी पोहचलो.

असे आहेत आपले भक्तावत्सल भक्तभिमानी शिर्डीनिवासी श्री समर्थ साईबाबा.

''त्याना पुनच्च कोटी कोटी सांष्टांग नमस्कार'' अशा या भक्तवत्सल साईमाऊली जवळ मी काय मागणार !

**हेचि दान देगा देवा !**
**तुझा विसर न व्हावां !**

**जयकुमार मु. ठाकूर**
**मुंबई.**

## श्री साई कृपा

आठवणीत रेंगाळणारा हा प्रसंग फार वर्षां पूर्वीचा, पण अजुन नजरे समोर येतो. मी त्या वेळेस चंद्रपूर जिल्हा परिषदे मध्ये उपशिक्षणाधिकारी या पदावर काम करीत होतो.

नोव्हेंबर १९७८ च्या शेवटच्या आठवड्यात मुंबईला भारतांतील सर्व प्राथमिक शिक्षकांच्या पदाधिकाऱ्यांची परिषद होती. चंद्रपूर जिल्हातील प्राथमिक शिक्षकांच्या पदाधिकाऱ्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी मला देखील बोलावण्यांत आले होते. पंचायतसमिती मधील दोन शिक्षक माझ्या बरोबर होते.


परिषदेला उपस्थित राहाण्यासाठी चंद्रपुरच्या सायंकाळच्या रेल्वेने निघालो. त्या वेळी महाराष्ट्र एक्सप्रेसचे आरक्षण वर्ध्यावरून करावे लागत होते. वर्ध्याला महाराष्ट्र एक्सप्रेसमध्ये बसलो. कारण चंद्रपूरला आमचे असे ठरले होते की कोपरगांवला उतरुन शिर्डीला श्री साईबाबांचे दर्शन घेऊन मनमाड मार्गे मुंबईला जावयाचे.

वर्ध्याहून महाराष्ट्र एक्सप्रेसने निघालो. महाराष्ट्र एक्सप्रेस पहाटे तीनच्या सुमारास कोपरलगांवला पोहचली. सकाळपर्यंत प्लॅटफॉर्मवर पडून राहण्यापेक्षा शिर्डीला जाण्यासाठी काही वाहन मिळते कां हे पाहण्यासाठी गुरुजी प्लॅटफॉर्म बाहेर निघाले. अंधारात काही अंतरावर त्यांना एक टांगा घोडा चरण्यासाठी सोडून उभा दिसला. घोडा रोडकेला होता. स्टेशनवर पडून राहण्यापेक्षा या वाहनाचा उपयोग घ्यावा असे आम्हास वाटले. दोन रुपये प्रत्येकी भाडे द्यावे असे ठरले.

घोड्याची चाल मंद होती. सर्वत्र अंधार होता. झोपेची वेळ असल्यामुळे आम्ही तांग्यात पेंगत होतो. वातावरण शांत होते. कोपरगांवात साखरेच्या कारखान्याचा आवाज येत होता. सर्वांच्या मनांत एकच विचार घोळत होता तो म्हणजे शिर्डीला पोहोचल्यावर झोप घेऊन देव दर्शन करावे.

टांगा एका पुलाच्याकडे जाण्याच्या चढावाच्या रस्त्याला लागला. घोड्याची चाल स्थिरावली. टांगेवाल्याने घोड्यास चाबकाने मारण्यास सुरुवात केली. माराने थकलेला घोडा कसातरी आम्हा तिघांना घेऊन पुलावर आला. घोंड्याने आपली चाल थांबवली. तो जागचा हलेना. टांगेवाला खाली उतरला. घोड्याचा लगाम हातात घेतला व घोड्याने पुढे जाण्यास नकार दिला. पुलाच्या दोन्ही बाजूस कठडा नव्हता.

टांगेवाल्याचा राग अनावर झाला. टांगेवाल्याने चाबकाच्या काठीने घाड्याच्या समोरच्या पायावर मारण्यास सुरवात केली.



घोडा समोर जाण्याऐवजी मागे सरकू लागला. टांगा मागे सरकत सरकत पुलाच्या कांठाजवळ आला. श्री तेलंग व श्री डोईफोडे या दोघांनी प्रसंग पाहून टांग्यातून उड्या मारल्या. टांगा काठाजवळ असल्यामुळे मला उडी मारणे अशक्य होते. कारण समोर पुलाच्या खाली खोल जमीन होती. मी टांग्यात बसून होतो. घोड्याने तोंडानें लगामाला हिसका दिला. लगाम टांगेवाल्याच्या हातातून सुटला. आणि त्या अंधा-याराञी मी, टांगा आणि घोडा, पुलाखाली कोसळलो. पुलाचा वरचा भाग आणि पुलाखालील जमीन या मध्ये सुमारे पंधरा फुटापेक्षा जास्त अंतर होते. काय घडले याची जाणीव नव्हती.

''साहेब'' या शब्दाने मी शुद्धीवर आलो. श्री तेलंग आणि डोईफोडे माझा शोध घेत पुलाखाली आले होते. त्या दोघांच्या हाकेने शुद्धीवर आलो. मी टांग्याच्या गादीवर पहूडलेला होतो.

एका बाजूला चष्मा व दुसऱ्या बाजूला बॅग पडली होती. चष्मा, बॅग व मी सुरक्षित होतो. टांग्याची दोन्ही चाके तुटली होती. घोड्याच्या पायात जखमा झाल्या होत्या. घोड्याच्या पायांतून रक्त येत होते. मला थोडे देखील खरचटले नव्हते. हा चमत्कार कसा झाला याचे त्या दोघांना आश्चर्य वाटत होते. आता मुक्कामाला पोचायचे कसे हा प्रश्न दोघांपुढे होता. त्यांना वाटले मी ऊठू शकणार नाही. मला आधार देऊन दोघांनी उठविले. त्यांची कल्पना झाली की मी चालू शकणार नाही. मी उभा राहिलो तेव्हा त्या दोघांनी सुटकेचा निस्स्वास सोडला. टांगेव्यालाला काही पैसे देऊन आम्ही पुलावर आलो.

साईबाबांचे नांव घेऊन आम्ही पायीच अंधारांत शिर्डीचा मार्ग धरला. शिर्डीला पोहोचलो तेव्हा उजाडले होते. सकाळचे कार्यक्रम आटोपून स्नान केले आणि साईबाबांच्या दर्शनास निघालो.

मी अनेकदा दर्शनाला आलो होतो पण आताचे मूर्तीचे ते चंदन चर्चित रुप आगळं वेगळं दिसलं. मनोभावे दर्शन घेतलं. ''किती सुंदर परिसर आहे हा। मूर्तीचं रुपही प्रसन्न आहे, नाही।'' मनांत म्हटलं.

प्रसाद घेतला आणि ऑल इंडिया प्राथमिक शिक्षकांच्या परिषदेसाठी उपस्थित राहाण्यास मुंबईला मनमाड मार्गे प्रयाण केले. अजून तो प्रसंग मनांत रेंगाळत आहे.

**साईकृपा जया पाही ।**
**मरण भय तया नाही ।**
**मूक भक्त तव पावन चरणी ।**
**बोलू लागे महान करणी ।**

**भ. शि. सावरकर**

## श्री साई कृपादृष्टी

श्रद्धा' 'सबुरी' दोन्ही किती साधे शब्द पण ताकद किती प्रचंड. या दोन्ही शब्दांचा प्रत्यय मला माझ्या जीवनामध्ये प्रत्येक क्षणी आलेला आहे. पूर्वीपासून आमच्या घरात देवाचे नामस्मरण नेहमीच होत असे. पण श्रीसाईबाबांच्या नामस्मरणापासून मला व आमच्या व आमच्या घरातील सर्वांना प्रत्येक कार्यामध्ये यश मिळू लागले.

जुलै १९७९ च्या सुमारास वडिलानी माझे लग्न ठरविले. देणे घेणे वगैरे सर्व काही वडिल व इतर मंडळी बैठकीत ठरवून आली. आमच्याकडे तर पैशाची काहीच शिल्लक नव्हती. आणि लग्नाला तर सोनेवगैरे सर्व काही मिळून ७ ते ८ हजार रु. खर्च होता. घरात मीच मोठी. माझ्या पाठची दोनही भावंडे शिकत होती. वडिलांचा धंदा (प्रेस) तोट्यात गेलेला. कुठे मिळेल ती छोटी मोठी नोकरी ते करीत असत. माझ्या पगारावरच घर कसे बसे चालू होते. फारच कठीण परिस्थिती होती. आम्ही सर्वजणच दररोज न चुकता श्री साईबाबांचे नामस्मरण करीत असू. मी वेळात वेळ काढून 'श्री साईस्तवनमंजिरी'चे दररोज पठण करीत असे. व सांगत असे की ''बाबा आता तुम्हीच आमचे तारणकर्ते.''

मार्चच्या ४ तारखेला लग्नाचा मुहुर्त निश्चित झालेला होता. एवढ्यात माझी मावशी आमच्या मदतीला धावून आली तिने तिच्याकडील सोन्याच्या बांगड्या आम्हाला दिल्या व आमची मुख्य अडचण निभावली. अशाचप्रकारे बाकी ओळखी पाळखीच्या लोकांनीसुद्धा पैशाची मदत केली व कार्य अत्यंत मजेत पार पडले.

पुढे श्री साईबाबांच्या कृपेने भावाचे शिक्षण पूर्ण झाले व त्याला सरकारी नोकरी मिळाली त्याने माझ्या लग्नाचे सर्व कर्ज फेडले.

**सौ. प्रज्ञा. बेर्डे**

## मी अनुभवलेली साई कृपा

ही गोष्ट आहे १९८५ मधील. त्या वेळी मी नुकताच बी. ए. झालो होतो. मला बी. ए. ला परसेंटेज कमी पडल्यामुळे मी फारच निराश झालो होतो. कारण मला लेखन करण्याचा नाद असल्यामुळे आपण शिक्षक व्हावे असे माझ्या आयुष्याचे फार मोठे स्वप्न होते. परसेंटेज कमी असल्यामुळे आता आपल्या नंबर बी. एड्ला लागणार नाही व आपण शिक्षक होणार नाही असे माला वाटू लागले त्यामुळे माझे भवितव्य मला अंधकारमय दिसू लागले योगायोगाने त्याच वर्षी जुलै महिन्यात गडचिरोली इथे बी. एड् कॉलेज सुरु झाले आणि माझ्या निराशेचे आशेत रुपांतर झाले आपला गडचिरोलीला डोनेशन देवून का होईना नंबर लागेल असे वाटले. बी. एड्. साठी मी, माझे वडील व भावाने खूप प्रयत्न केले. वेळ पडल्यास दहा हजार रुपये डोनेशन देण्याची तयारी होती पण वाटेल त्या मार्गाने प्रयत्न करूनही मला प्रवेश मिळाला नाही. शेवटी मी निराश अवस्थेत घरी परत आलो. त्याच वेळी मी माझ्या डायरीत नोंद करून ठेवली की कदाचित या बरबादी पासून साईबाबांनाच आम्हाला वाचवायचे असेल कारण दहा हजार डोनेशन देणे आणि राहण्याच्या खाण्यापिण्याचा वर्षभरातील खर्च, जवळपास दहाहजार रुपये आलेच असते. आमच्यासारख्या सामान्य माणसाला ते परवडण्यासारखे नव्हतेच परंतु काळ आणि वेळ पाहून माणूस कधीकधी पैशाचा विचार करीत नाही. परंतु साईबाबांना आमची आर्थिक बरबादी होऊ द्यायची नव्हती.

त्यानंतर १९८६ साली मी अनेक ठिकाणी बी. एड् कॉलेजचे फॉम भरले व मुलाखतीला कुठेतरी बोलावतील म्हणून वाट पाहू लागलो. पण एकाही कॉलेजमध्ये मुलाखतीला बोलावले नाही आपले काही बी. एड् होत नाही असेच मला वाटले. अखेर एक दिवस गोंदिया येथील पूजाभाई पटेल महाविद्यालयात मुलाखतीचा कार्ड आले ते कार्ड पहाताच मला असे वाटायला लागले की गोंदियाला आपला नंबर लागलाच. ठरलेल्या दिवशी गोंदियाल गेलो. मुलाखत झालीच पण बाहेरून कोठे एखाद्या नेत्यालां पकडून आपला नंबर लावावा म्हणून आपल्या जावया सोबत मी अनेक नेत्यांना भेटलो पण सगळ्यांचे एकच उत्तर ''आपका नंबर लगताही नही.'' पुन्हा माझ्या मनात निराशा आली. अखेर साई, साई असे नामस्मरण करीत नंबर लागण्याची वाट पाहू लागलो त्या वेळेस एक दिवस मला एक सुंदर स्वप्न पडले आणि माझा आत्मा मला सांगू लागला, ''अरे तुझा नंबर लागला. सकाळी स्नान वैगरे आटपून साईबाबांचे नाव घेत लिस्ट पहायला गेलो आणि साईबाबाचा आयुष्यातीलपहिलाच चमत्कार अनुभवला माझा बी. एड् ला नंबर लागला होता. त्यासाठी मला कुणाचीही विनंती करावी लागली नव्हती, किंवा दहा हजार ऐवजी दहा पैसेही खर्च करावे लागले नाव्हते. एवढेच नव्हे तर पूजाभाई शिक्षण महाविद्यालया सारख्या चांगल्या कॉलेजमध्ये साईनी मला प्रवेश मिळवून दिला होता. बाबा विषयी हेमांडपंतांनी म्हटले आहे. पावसाच्या धारा मोजता येतील, वाऱ्याला मुठीने बांधता येईल पणं साईबाबाचे चमत्कार मात्र अतर्क्यच असतात ते आपल्या भक्तासाठी काय काय करतील हे त्यांनाच ठावूक.



बी. एड मध्ये प्रवेश मिळाला पाठ घेणे, अभ्यास करणे, इतर उपक्रम राबविणे यात एक वर्ष कसे गेले हे काही कळलेच नाही. शेवटी परीक्षेचा पहिला दिवस उगवला त्या दिवशी तत्त्वज्ञानाचा पहिला पेपर होता पेपरची वेळ २-३० अशी होती तो दिवस होता. गुरुरारचा मला उपवास असल्यामुळे एक वाजे पर्यंत अभ्यास केला व बिस्किट पुडा आणून चहा बनविला त्या वेळेस माझा एक मित्र माझ्या रुमवर आला व अभ्यास करू लागला मी त्याला चहा व बिस्किट खायला दिले. पण तो चहा घ्यायला व बिस्किट खायला नकार देत होता. अखेर खूप आग्रह केला तेव्हा कुठे त्याने चहा घेतला. त्या नंतर आम्ही सर्व होस्टेलची मुले परीक्षा द्यायला गेलो. कॉलेजमध्ये इतर विद्यार्थ्यांची परीक्षा सुरु असल्यामुळे पेपर सुटे पर्यंत आम्ही बाहेर सावलीचा आधार घेवून उभे होतो तितक्यात माझा मित्र चक्कर येवून खाली पडला आम्ही सर्व ओरडलो, ''धावा ऽऽऽ धावाऽऽ पाणी आणा'' याच भानगडीत पंधरा मिनीटे निघून गेली. त्याला आम्ही प्राचार्यांच्या कार्यालयात ठेवले. व पेपर सुरू झाल्यामुळे पेपर द्यायला निघून गेलो. अभ्यास चांगला असल्यामुळे सर्वच प्रश्न मी सोडविले फक्त पाच मार्काचा शेवटचा प्रश्न सोडवायचा होता. तो सोडवत आहे इतक्यात एकाने बातमी आणली. ''चिंचखेडेकी डेथ हो गयी'' आणि जीवनात कधी नव्हे एवढा जबरदस्त हादरा बसला. एकसारखे माझ्या मित्राचे फडफडणे मला दिसू लागले. एखाद्या कोंबडीला मारताना ती जशी फडफडते तसाच तो फडफडत होता. त्या आघाताचा तात्कालिक परिणाम माझ्यावर झाला होता. मी रूमवर परत आलो. पण मला काहीच कळत नव्हते. त्याने माझ्याकडे पुस्तक ठेवले होते. त्या अनेक रात्री मला असे वाटायचे की जणू काही तो माझ्याशी बोलतो आहे व म्हणतो आहे ''पौनीकर माझे पुस्तक चांगले ठेव बरं'' त्या वेळेस अंगाचा एकसारखा थरकाप उडत होता. अभ्यासातून मन उडाले होते. समोर पेपर... मृत्यूचे वादळ... मन सांभाळावं कसं, शिक्षक होण्याचे स्वप्न मोठ्या कठीण प्रसंगातून बी. एड् ला नंबर लागला, पण त्याही पेक्षा मोठी कठीण परीक्षा चालली होती माझे मन मला सांभाळताच येत नव्हते वाटलं परीक्षा सोडून गावी परत जावं अशा मानसिक अवस्थेत आपण परीक्षा दिली तर मनावर फार वाईट परिणाम होतील असे वाटले. पण अखेर ठरवले घरी परत जायचे नाही माझ्या जीवनाची नाव मृत्युच्या वादळात सापडली ती मी किनाऱ्याला लावण्यास पुर्णपणे असमर्थ होतो. शेवटी साईला आर्त स्वराने हाक मारली ''बाबा मी परीक्षा देण्यास असमर्थ आहे, आता तुच सांभाळ मी अशा कठीण प्रसंगात यश मिळवू शकत नाही, परीक्षा तर देतोच पण मिळणारे यश तुझेच असेल व तुलाच ते अर्पण करेन'' शेवटी साईबाबांचे नामस्मरण करीत सतत बारा दिवस जागून काढले कारण झोप लागत नव्हती.

परीक्षा दिली परीक्षा कशी दिली माहित नाही. माझ्या समोर फक्त साई होते एक दिवश निकाल लागला. मी पास झालो माज्या अंतःकरणातून शब्द बाहेर पडले साई ! साई !! साई !!! कारण त्यांच्या कृपेने मला बी. एड् ला प्रवेश मिळाला होता. व बी. एड्ची परीक्षाही त्यांनीच पार पाडली होती यात शंकाच नाही त्याच वर्षी बाबांच्याच कृपेने मला वाठोण्याला नोकरी लागली. नोकरीसाठीसुद्धा मला दारोदार भटकू दिले नाही. त्याच वर्षी दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये मी रमेश काळे या माझ्या मित्रासोबत पहिल्यांदाच शिर्डीला गेलो व बाबांच्या कृपेने मिळालेले यश अर्पण करून आलो तेव्हा पासून बाबा प्रत्येक क्षण सोबत असतात व मला सांगीत असतात.

**होऊ नको चिंताग्रस्त ! घरी जाऊनी बस स्वस्थ,**
**भरवसा ठेव अल्लावर ! अल्ला मालिक तारील !**
**ऐकूणी ऐसे साईवचनं ! निश्चित होऊन मानसी !**

**– अविनाश पौनीकर**

# अभिप्राय




## श्रीगुरुकृपा

**श्री** साईलीलाचा दसरा विशेषांक मिळाला. धन्यवाद ! अंक सर्व दृष्टीने वाचनीय आणि संग्रहणीय झालां आहे. विविध विषयांची व्याप्ती वाढली आहे. बोधकथा सदर नवीन सुरु केले आहे. बोलीभाषेत आणि समाजातील सर्व लहान थोरांना समजेल अशा विषयाचा धागा धरून काही चांगला बोध घेता येईल त्याचप्रमाणे प्रयाण नीतीमत्तेची जाणीव लोकांमध्ये जागृत होईल असे वाटते.

श्री साईबाबांचे विषयी भक्तांचे विविध अनुभव बोलके असुन भक्ती वाढविण्यास उपयुक्त आहेत. 'तुम्ही मजकडे पहा, मी तुमच्याकडे पाहीन' किंवा भक्तीभावाने आणि नितांत श्रद्धेने हाक मारल्यानंतर गुरुमहाराज मदतीस धावून येतात. गुरुशिष्याचे नाते हे अतिशय जवळचे आहे, हेच भक्तांच्या अनुभवावरून सिद्ध होते !

**म. पां. वाळिंबे**
३३७ यादोगोपाळ पेठ,
सातारा.

❖❖❖

## अमृतकलश मार्मिक

**श्री** साईलीला, दसरा अंकाची सजावट छान आहे. अमृतकलश म्हणून जे सदर आहे ते अतिशय मार्मिक वाटते. तुमच्या स्वतःचा श्रीसाईबाबाः 'अवतार आणि कार्य' हा लेखही चांगला झाला आहे विशेषतः त्यांचा सर्वधर्म समभाव उल्लेखनीय वाटतो. मुखपृष्ठ ४ वरील चित्रे आकर्षक आहेत. अशी प्रति अंक टाकणार असे दिसते. ईश्वरकृपेने अन्य सर्व क्षेम.

**डॉ. ग. प्र. परांजपे**
१३२७ ई, सदाशिव पेठ,
७ विठ्ठलनगरी, पुणे ३०.

## श्री साईलीला म्हणजे नंदादीप

**स.** न. वि. वि. श्री साईलीलाचा सुंदर अंक मिळाला. अंकाची मांडणी, संपादन, भाषेची श्रीमंती, ज्ञानाची समृद्धी, आणि विविध विषयांचे नाविन्य म्हणजे साई-भक्तांना मेजवानीच !

विज्ञानयुगात उपभोगाची विविधता वाढली हे खरेच. पैशाची श्रीमंती वाढली असेल पण मनाचं भिकारीपण त्याचं स्वास्थ बिघडून टाकते. मनाची मशागत करण्याचे काम केवळ संतसाहित्य त्यांचे विचारच करतात. आणि हेच कार्य गेली ७५ वर्षे साईलीला करीत आहे. श्री साईलीला गेली ७५ वर्षे अव्याहतपणे प्रकाशित होत आहे त्याचे कारण म्हणजे श्री साईबाबांचे विचार. श्री साईबाबांसारख्या संताचे विचारच आज या विज्ञान युगात मानवाला तारीत आहे.

श्री साईलीला म्हणजे बाबांच्या विचारांचा अखंडपणे तेवणारा नंदादिप ! ह्या नंदादीपाच्या प्रकाशात अंधाऱ्या मनाची कवाडं स्वच्छ होतात, मनाची जळमटं दूर पळून जातात. बाबांच्या विचाराचा सुगंध आज साऱ्या विश्वात दरवळत आहे हे वाचून मनाला आनंद होतो.

बाबांच्या यातीनंतरही त्यांच्या विचारलहरींचे तरंग आणि स्पंदने आज लाखोंच्या रुपाने उमटत आहेत, अनेकांना दिशा दाखवण्याचे महान कार्य, पवित्र कार्य करीत आहे. यात साईलीलाचा सिंहाचा वाटा आहे. अशा या 'श्री साईलीला परिवाराला आई तुळजाभवानी उदंड आयुष्य देवो.

**बापूसाहेब पिंगले**
पुणे-२.

❖❖❖

## उत्तम सजावटीचा अंक

पूर्वीचा श्री साईलीला वाचला. श्रीकृष्णाच्या मनोहारी मुखपृष्ठाने तो अंतरंगीही उत्तम रुजला आहे. दिवसेदिवस श्री साईलीलाची छपाई, उत्तम लेख व उत्कृष्ट सजावटही प्रकर्षाने जाणवते. धन्यवाद !

**कृष्णा तेली**, कुडाळ.

❖❖❖

## आध्यात्मविषयी ज्ञानवर्धक अंक

श्री साईलीला अंक नेहमी मिळतो. जुलै-ऑगस्ट १९९७चा 'गुरु पौर्णिमा विशेषांक' मिळाला.

या अंकातील सर्वच लेख उत्तम दर्जाचे असून ज्ञानात भर टाकणारे आहेत.

विशेषतः १) हेमाडपंत विरचित 'गुरुमहात्म्य'

२) श्रीसाईबाबांचे गुरुउपदेशाबद्दलचे अमृतविचार

३) श्रीसाईबाबांचे गीताप्रवचन इ. लेख विशेष आवडले. श्री साईलीला अंक म्हणजे उत्तम आध्यात्मिक वाङ्मय असून आमच्या सर्व कुटुंबीयाना तो मोलाचा आधार वाटतो.

**जे. एस्. तिवाटणे**

❖❖❖

## आकर्षक रचना असलेला अंक

श्री साईलीला, 'अमृत महोत्सवी वर्षा'चा अंक प्राप्त झाला. अंकाचे मुखपृष्ठ व अंतरंग अतिशय आकर्षक वाटले. विशेषतः 'कृष्णं वंदे जगद्गुरु' अतिशय सुरेख. गीतेतून समर्पित महाभारत अतिशय छान.

अंकाच्या रचनेच्या कल्पनेची स्तुती करावी असे वाटते. विशेषतः प्रसंगानुसार अंकाचे प्रकाशन करीत असता त्याबद्दल शतशः धन्यवाद.

अंकसुद्धा वेळेवर मिळत आहे. त्याबद्दल प्रकाशन संस्थेचा आभारी आहे.

**ॲडव्होकेट किशोर सताळकर**

❖❖❖

## अंकरुपाने बाबाच आमच्या घरी येतात !

जुलै-ऑगस्ट १९९७ गुरुपौर्णिमा विशेषांक गुरुमहिमा वर्णन छान आहे. त्यातील डॉ. ग. वा. तगारे (सांगली) यांचा "विश्वात्मक माझा स्वामी निवृत्ती राजा" हा लेख निवृत्ती नाथांविषयी चांगला आहे. ज्ञानेश्वर माऊलीचे गुरु, बंधु, माता, पिता, हे सर्व निवृत्तीनाथ होते मग ते उपेक्षित कां ? जसा 'कर्णास' मृत्युंजयमध्ये श्री. शिवाजी सावंतानी न्याय दिला तसा.

निवृत्तीनाथांविषयी कोणी लिहिले कां ? त्यांच्याविषयी तज्ञांनी, विचारवंतानी भरपूर लिहावे, हे सुचवावेसे वाटते. 'श्री साईलीला' अंक नेहमीच वाचनीय व माहितीपर असतो. अंक येतो त्या दिवशी प्रत्यक्ष साईबाबाच आमच्या घरी येतात असे वाटते.

**श्री. एस्.बी. निकुंब**
लष्करवाडी, जालगांव,
ता. दापोली, जि. रत्नागिरी.

❖❖❖

## सुंदर व मार्गदर्शक अंक

श्री साईलीलाचा 'गुरुपौर्णिमा' विशेषांकपोचला. जगद्गुरू श्रीकृष्णाला प्राधान्य देऊन प्रा. बेलसरे, अनंतराव आठवले इ. विचारवंतांचे लेख विचारप्रवण करणारे आहेत साईबाबांनी देशमुख बाईंना दिलेला गुरुमंत्र आम्हा सर्वांनाच मार्गदर्शक आहे. साईबाबांचे अंक सुंदर अन् वेळेवर काढल्याबद्दल धन्यवाद.

**डॉ. ग.वा. तगारे**

❖❖❖

## पुण्यस्मरण सत्याची प्रचीती आली

जुलै-ऑगस्ट ९७ 'श्री साईलीला' अंकाच्या मुखपृष्ठावरील मुरलीधराचे मनोहारी रंगीत चित्र आवडले. संपादकीय वाचनीय वाटले. विविध लेखांतून घडणारे श्रीकृष्णाचे मनोज्ञ दर्शन म्हणजे श्री साईबाबांचे पुण्यस्मरण या सत्याची प्रचीति आली.

**सौ. आसावरी वायकूळ**

०००

# साईभक्तांना आवाहन

प्रिय साईभक्तांनो !
सप्रेम नमस्कार,

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपण सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा. या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे. यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावर कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे.

कळावे. श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकीत,
**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक
'श्री साईलीला'

--------------- इथे कापा ---------------

कार्यकारी संपादक
'श्री साईलीला',
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई - ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येक ५० रु. प्रमाणे रु. २५० (एकूण दोनशेपन्नास मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ______________________

पत्ता : ______________________

______________________

(ता.क.: सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्रमांक | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ४८.०० | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | २४.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २३.०० | १०.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | २२.०० | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २७.०० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २७.०० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.५० | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ६.६५ | ८.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ८.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ८.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ८.०० |
| १७. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | २.०० | ८.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.२५ | ८.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ८.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | १.१० | ८.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ४.६० | ८.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | - | ८.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ३.०० | ८.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | - | ८.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | २.०० | ८.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ८.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | २.०० | ८.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ८.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - | ८.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ८.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ८.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | - | ८.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिरडी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ८.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० | १०.०० |


# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विक्रीसाठी उपलब्ध प्रकाशित फोटोंची यादी

| अ. क्र. | फोटोचे नाव | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' X २०'' | २.६० |
| २. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | पोष्टकार्ड | - |
| ३. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | २'' X ३'' | ०.२० |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १४'' X २०'' | २.६० |
| ५. | द्वारकामाई (४ रंगात) | १०'' X १४'' | १.३० |
| ६. | मूर्ती (४ रंगात) | १४'' X २०'' | २.६० |
| ७. | मूर्ती (४ रंगात) | १०'' X १४'' | १.३० |
| ८. | मूर्ती (४ रंगात) | ७'' X १४'' | ०.७० |
| ९. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' X २०'' | २.६० |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १०'' X १४'' | १.३० |
| ११. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | ७'' X १०'' | ०.७० |
| १२. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०.३० |
| १३. | पालखी (४ रंगात) | ७'' X १०'' | ०.७० |
| १४. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४'' X २०'' | २.१० |

सर्व फोटोकरिता पेकिंग व पोस्टेजचा दर रु. ९.०० आहे.

## श्री साईंच्या पादुका केवळ शिरडी येथेच !



आज - काल बाबांच्या नावावर असंख्य ठिकाणी पादुका दिसतात. या पादुका म्हणजे नुसत्या पादुकांच्या प्रतिमा असतात. त्या बाबांनी वापरल्या असणयाचा प्रश्नच उद्‌भवत नसतो. तरीही त्या प्रतिमांच्या दर्शनासाठी हजारो भाविक गर्दी करतात. हा त्या पादुका प्रतिमांचा प्रभाव नसून सामान्य माणसाच्या मनातील बाबांविषयीच्या श्रद्धेचा प्रभाव असतो. श्री. साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाने एका ठरावाद्वारे सर्व भाविकांना सूचित केलेले आहे की, श्री साईबाबांनी वापरलेल्या प्रत्यक्ष पादुका शिरडी येथे समाधीमंदिरातच असून तशा पादुका अन्यत्र कुठेही नाहीत, याची भाविकांनी कृपया नोंद घ्यावी.

# श्री साईलीला



मशिदीच्या आंगणांत चूल एक मोठी रचित... कधीं मिठे चावल करीत कधीं कणिकेची मुटकुळी वळीत...



[illegible]

Registered with the Registrar for News-papers of India No. MI

# श्री साईली

